# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० / फाल्गुन शु. २, १९४१ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री | |
| (३) | गृहनिर्माण मंत्री | |
| (४) | नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७१**

---

### मुंबईतील माहीम व उपनगरातील मढ, भाटी, मढ धोनीपाग आणि पालघर जिल्हयातील बंदरांचा विकास आणि जेट्टींच्या कामांबाबत

**(१) * २७३९ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहीम, मुंबई उपनगरातील मढ, भाटी, मढ धोनीपाग आणि पालघर जिल्हयातील वडराई, दातिवरे, एडवण, सातपाटी या बंदरांचा विकास आणि जेट्टींचे काम सन २०१२-१३ मध्ये अंकिता इंटर प्रायजेस या कंपनीला दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी नाबार्ड आणि मत्स्य व्यवसाय विभागाने निविदा काढून आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला तरीही ठेकेदार कंपनीने या आठही जेट्टींची कामे पूर्ण केली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जेट्टीच्या कामासाठी अंकिता इंटर प्रायजेसने नवीन निविदा मंजूर करुन घेतल्याचा आरोप करुन अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीच्या अध्यक्षांनी पुर्वीचे काम जोपर्यंत ठेकेदाराकडून पूर्ण होत नाही, तोपर्यंत ठेकेदाराला नवीन बंदराच्या कामाची निविदा देऊ नये तसेच सदर ठेकेदारास काळ्या यादीत टाकावे अशी मागणी दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पणन अभियंता-कोकण भवन यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे

८ कामापैकी ४ कामे पूर्ण झाली असून ४ कामे स्थानिकांच्या विरोधामुळे अपूर्ण आहेत.

(३) होय,

(४) दि.३.१.२०२० नंतर ठेकेदारास नवीन काम देण्यात आलेले नाही. शिल्लक कामे निविदा अटी व शर्तीप्रमाणे करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भांडेवाडी (जि.नागपूर) येथे कचऱ्यावर पुनर्प्रकिया करणाऱ्या हंजर बायोटेक कंपनीकडून झालेला गैरव्यवहार

**(२) * ९२ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील भांडेवाडी येथे कचऱ्यावर पुनर्प्रकिया करुन खत तयार करणाऱ्या हंजर बायोटेकची यंत्रसामुग्री जुनाट व अकार्यक्षम असून कंपनीकडून पुनर्प्रकिया करताना कचऱ्याचे आकडे जास्त दाखविण्यात आल्याने यात गैरव्यवहार झाला असल्याची माहिती माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर महानगरपालिकेकडून चौकशी करण्याकरिता पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी समितीचा अहवाल महानगरपालिका सभागृहात सादर केला असून हंजर कंपनीकडून नागपूर महानगरपालिकेने दंड आकारून वसुली केली आहे काय, तसेच हंजर कंपनीसह दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर शासनाने कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) • हंजर कंपनीने महानगरपालिकेची फसवणूक करुन, आजअखेर रु.१८,८९,८५,००७/- इतक्या रकमेची खोटी देयके उचलली व पूर्व परवानगी शिवाय संपूर्ण मशीनरी परस्पर विक्री केली, एवढेच नव्हे तर संपूर्ण कवाडची देखील विक्री केली अशी चर्चा महानगरपालिकेच्या दिनांक २२/०८/२०१९ रोजीच्या सर्वसाधारण सभेत झाल्यानंतर, या संपूर्ण बाबीसंदर्भात निर्णय घेण्यासाठी सदरचे प्रकरण विधी व सामान्य प्रशासन विशेष समितीकडे वर्ग करण्याचा निर्णय ठराव क्र.४४२ अन्वये मंजूर केला असून, समिती मार्फत चौकशी सुरु करण्यात आली आहे. असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(३) व (४) • दिनांक २२/०८/२०१९ ठराव क्र.४४२ अन्वये नियुक्त समितीची चौकशी कार्यवाही अद्याप सुरु आहे.

हंजर कंपनीच्या या प्लॅन्टला दिनांक २४/११/२०१२ रोजी आग लागल्यानंतर, या प्लॅन्टची कार्यक्षमता कमी झाली व त्यानंतरही कंपनीने वेळोवेळी योग्य उपाययोजना न केल्यामुळे सदरचा प्रकल्प दिनांक २९/१०/२०१३ पासून दिनांक २१/०६/२०१८ या कालावधीत वेगवेगळ्या कालखंडात एकूण ५४४ दिवस बंद राहिल्यामुळे, कंपनीला एकूण रु.२.११५ कोटी इतका दंड लावलेला आहे.

तथापि, कंपनीकडून सदरच्या दंडाची रक्कम भरणा केली नसल्यामुळे, ऑक्टोबर, २०१६ पासून महापालिकेकडून कंपनीला टिपींग फी पोटी प्रती मे.ट. रु.३३०/- प्रमाणे देय असलेली एकूण रक्कम रु.१.१० कोटी आज अखेर दिलेली नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या इमारतीतील रहिवाशांकरिता नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(३) * ४२४१ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या इमारतीतील (एसआरए) रहिवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व बेकायदा रहिवाशांची चौकशी करण्यासाठी तत्कालिन शासनाने मा.गृहनिर्माण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, किती कालावधीत अहवाल प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. जितेंद्र आव्हाड :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या इमारतीतील (एसआरए) रहिवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली नाही. तथापि, बेकायदा रहिवाशी म्हणजे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसन सदनिकांची खरेदी-विक्री करण्यात आलेल्या प्रकरणांसंबंधी मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली रिट याचिका क्र.१६८५/२०१४ च्या अनुषंगाने व विधानसभेमध्ये दिलेल्या आश्वासनानुसार शासन स्तरावरुन धोरण ठरविण्यासाठी शासन निर्णय दि.०९.०१.२०१७ अन्वये तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती.

(२) व (३) सदर समितीने दि.०७.०३.२०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३E मधील तरतूदींनुसार निष्कासनाची कारवाई सुरु आहे. अधिनियमातील सदर तरतूदीत दुरुस्ती व अभय योजनेचा प्रस्ताव विशेष विनंती अर्जाद्वारे मा.उच्च न्यायालयाच्या संमतीसाठी सादर करण्याचा निर्णय मंत्रीमंडळ उपसमितीमध्ये घेण्यात आला.

मंत्रीमंडळ समितीचा अहवाल मा.मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात आला होता. मा.मंत्रीमंडळाच्या निर्देशानुसार रिट याचिका क्र.१६८५/२०१४ मधील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव विशेष अर्जाद्वारे मा.उच्च न्यायालयासमोर ठेवण्याची कार्यवाही सुरु आहे. त्या करीता सहाय्यक सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सूचविल्यानुसार मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून दि.१८ जून, २०१९ व दि.१४ ऑगस्ट, २०१९ च्या पत्राद्वारे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. तथापि, त्यांचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.

-----------------

## मुंबई-नागपूर (समृद्धी) महामार्गासाठी जमिन खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(४) * १६६२ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर (समृद्धी) महामार्गासाठी निधी उभारण्यासाठी राज्य शासनाने स्टेट बँकेकडून ४ हजार कोटी रुपयांचे अंतरिम कर्ज घेण्याचा निर्णय घेऊन कर्ज परतफेडीची हमी दिली असल्याचे दिनांक १७ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी विशेष म्हणजे खुल्या बाजारातून ७.३ टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध होत असतांना शासन ९.७५ टक्के व्याजाने कर्ज घेणार असल्याने सदर महामार्गासाठी वाढीव व्याजदराने कर्ज घेण्याची नेमकी कारणे काय आहेत,
(३) तसेच, प्रस्तावित मुंबई-नागपूर (समृद्धी) महामार्गालगत जमीन खरेदीसंदर्भात मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केलेला असल्याची कागदपत्रे तत्कालीन मुख्यमंत्री कार्यालयात सुपूर्द करण्यात आली होती व सदर गैरव्यवहाराबाबत चौकशी समिती नेमण्याचे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तद्‌नुसार चौकशी समिती नेमण्यात आली आहे काय, समितीचा अहवाल काय आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकल्पासाठी भारतीय स्टेट बँकेकडून रु.४,००० कोटीचे अंतरिम कर्ज उभारण्यास शासनाने वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.शाहमी-२०१९/सा.बां.वि./प्र.क्र.४७/अर्थबळ, दि.७ ऑगस्ट, २०१९ अन्वये मान्यता दिली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पाच्या निधी उभारण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८.०३.२०१७, दि.१३.०९.२०१७ व दि.०७.०१.२०१९ रोजी राज्यातील बँका व इतर वित्तीय संस्थासमवेत आयोजित करण्यात आलेल्या बैठकांमध्ये बँका व इतर वित्तीय संस्थामार्फत प्रकल्पाच्या निधीसाठी उत्तम प्रतिसाद मिळालेला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियासोबत केलेल्या व्यवहार्यता अभ्यासानुसार सदर प्रकल्पासाठी स्विकार्य कर्ज (Sustainable Debt) रु.२८,००० कोटी पर्यंत मर्यादित आहे. प्रथम टप्प्यात रु.२५,००० कोटी वित्तीय संमाप्ति अपेक्षित होते, ते दि.३०.०९.२०१९ रोजी साध्य करण्यात आले.

भारतीय स्टेट बँकेकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाचा व्याजदर हा ९.७५ टक्के असून तो जास्त आहे. कारण शासन घेत असलेल्या खुल्या बाजारातील कर्जावरील व्याजदर हा ७.३ ते ७.४ टक्के दरम्यान आहे. सबब, स्टेट बँक ऑफ इंडिया यांचा ९.७५ टक्के व्याजदर हा त्या तुलनेत जास्त वाटतो. सदर व्याजदर आणखी कमी करता येईल किंवा कसे, याची विभागाने शक्यता पडताळावी असे अभिप्राय वित्त विभागाने दिलेले होते. या संदर्भात असे स्पष्ट करण्यत येते की, हा व्याजदर पतमानांकानुसार आधारीत आहे. सदर प्रकल्पासाठी पतमानांकन A (-) आहे. शासनामार्फत उभारावयाची कर्जे व महामंडळामार्फत उभारवयाची कर्जे ह्यामध्ये तुलना करणे उचित होणार नाही. कारण शासन कर्जफेडीसाठी अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात येते. परंतू, सदर प्रकल्पासाठी महामंडळामार्फत उचल कर्जाची परतफेड ही केवळ प्रकल्पाच्या उत्पन्नास्त्रोतावर अवलंबून असते. त्यामुळे महामंडळामार्फत उचल कर्जावर जोखीम समज जास्त असल्याने व्याजदरामध्ये फरक पडतो. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेला व्याजदर हा प्रचलित आहे. तसेच असेही स्पष्ट करण्यात येते, की महाराष्ट्र शासनाच्या इतर अंगिकृत उपक्रमांनाही याच कालावधीत कर्जाव्दारे निधी उभारला असून, काहींना शासकीय थकहमी देण्यात आली आहे. त्या इतर सार्वजनिक उपक्रमांच्या कर्जावरील व्याजदर १०.४५ ते ११.०० टक्के इतका आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला द्यावयाच्या कर्जावर आकारण्यात येणाऱ्या व्याजदराबाबत उच्चतम स्तरावर चर्चा व वाटाघाटी झाल्या असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कर्जावर असलेला व्याजदर प्रचलित दरापेक्षा किफायतशीर आहे.

प्रकल्पाच्या कर्जाची किंमत कमी करण्यासाठी तसेच एकुण प्रकल्पखर्च कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ वचनबध्द आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग या प्रकल्पाची अंतीम सुचना प्रसारित केल्या नंतरच्या कालावधीत कोणत्या सनदी अधिकाऱ्यांनी अथवा लोकप्रतिनिधीनी स्वत: किंवा इतर कोणाच्या नावाने महामर्गालगत जमिनी खरेदी केल्या आहेत किंवा कसे याची चौकशी मा.लोकआयुक्त यांच्या मार्फत करण्यात यावी असे तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले

होते. त्यानुसार मा.लोकआयुक्त यांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन तक्रार निकाली काढून दप्तरी दाखल करण्यात आली असल्याचे दि.०९.०३.२०१८ रोजी पत्रान्वये अप्पर मुख्य सचिव गृह यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी हायब्रिड ॲन्युईटीच्या नव्या मॉडेलबाबत

**(५) * ५१ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी तत्कालीन शासनाने रुपये ३० हजार कोटी खर्च करुन हायब्रिड ॲन्युईटीचे नवे मॉडेल आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतील रस्ते प्रकल्पासाठी कंत्राटदारांकडून निधी उभारतांना त्यांना ज्यादा व्याजदर देण्यापेक्षा जागतीक बँकेच्या सहाय्याने स्वस्त व्याजदरात कर्ज घेऊन हे प्रकल्प पूर्ण करण्याच्या तत्कालीन शासनाच्या निर्णयास स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी कोणता निर्णय घेण्यात आला आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) राज्यातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी तत्कालिन शासनाने नोव्हेंबर, २०१६ ला रुपये ३० हजार कोटी खर्च करुन हायब्रीड ॲन्युईटीचे अंतर्गत रस्ते सुधारणा प्रकल्प मंजूर केली आहे. या योजनेतील रस्ते प्रकल्पाच्या कामांना

शासनाने स्थगिती दिलेली नाही. राज्यातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल अंतर्गत निविदा निश्चित करण्यात आल्या असून निविदा निश्चिती झालेली सगळी कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागातील मुंबई शहर विभागाचे कार्यकारी अभियंता यांची चौकशी करण्याची केलेली मागणी

**(६) * १४३६ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागातील मुंबई शहर विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसार माध्यमांना चुकीची माहिती देत असल्याचा आरोप करुन याप्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी सुशिक्षीत बेरोजगार पीडब्ल्युडी कॉन्ट्रेक्टर वेलफेअर असोसिएशनने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे वर्षभरात ३३+३३+३३ अशा तीन भागात मजूर संस्था, सुशिक्षीत बेरोजगार आणि खुल्या प्रवर्गातील कंत्राटदारांना कामे द्यायची असे शासनाचे धोरण असतांना सदर अभियंता हे आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना कामे देतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुशिक्षीत बेरोजगार व खुल्या प्रवर्गातील कंत्राटदारांना कामे मिळविण्यासाठी १८ ते २२ टक्के (बिलोरेट) दर खाली जावे लागत असून कार्यकारी अभियंता संगनमताने मर्जीतल्या ठेकेदाराला निविदा देत असून किमान टक्के दराने खाली जाऊन निविदा दिल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे त्यामुळे या प्रकरणी मुंबई शहर विभागाचे कार्यकारी अभियंते यांची तात्काळ चौकशी करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) उपरोक्त निवेदनात शासन निर्णयानुसार वर्षभरात ३३%, ३३% व ३४% या प्रमाणात मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व खुल्या प्रवर्गातील याप्रमाणे अंमलबजावणी करणेबाबत नमुद केलेले असून याबाबत दक्षता घेतली जाते. शासन सा.बां. विभागाने निविदेप्रक्रियेबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सर्व निविदा ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करुन निम्नत्तम देकाराची निविदा स्विकृत करुन त्याप्रमाणे कार्यारंभ आदेश दिले जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील रेवस-करंजा पुलाच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत

**(७) * ८८९ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील रेवस-करंजा पुलाकरिता सन १९८० मध्ये माजी मुख्यमंत्री बॅ.अंतुले यांच्या कालखंडात रुपये ३०० कोटीचा निधी मंजूर केला तर एमएमआरडीए कडून रुपये १४ कोटीचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेवस-करंजा पुलाकरता निधी मंजूर असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव अंतिम मंजूरीकरिता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सन २०१३ मध्ये रु. ३.५० कोटी मंजूर केले होते. प्राधिकरणाने सदर पुलाचा सुसाध्यता अहवाल तयार करुन घेतला असून सन २०१६ च्या दरसूचीनुसार रु. १२५५.०३ कोटी खर्च अपेक्षित आहे. परंतु सदर पुलाचा कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक व आरखडे तयार करण्यासाठी नव्याने सल्लागार नियुक्त करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ठरविले असून त्याकरीता २०१९-२० साठी रु. ५ कोटीची तरतूद केली आहे. नव्याने सविस्तर प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त झाल्यानंतर सदर पुलाबाबत प्राधिकरणाचा स्तरावर आर्थिक आढावा घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## तळोजा कारागृहातील (ता.पनवेल, जि.रायगड) शासकीय वसाहतीच्या इमारतीचे छत कोसळून झालेला अपघात

**(८) * २२९४ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) कारागृहातील शासकीय वसाहतीच्या इमारतीचे छत दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास कोसळून एक पोलीस शिपाई गंभीररित्या जखमी झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळोजा कारागृहातील कर्मचा-यांसाठी कारागृहाच्या मागच्या बाजूला सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या शासकीय वसाहतीतील १५ इमारतींपैकी ७ इमारतींची अत्यंत दूरवस्था झालेली असतांनाही सदर इमारतींची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या इमारतींच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व इमारतींच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सन २०१९-२० मध्ये उपलब्ध निधीमधून १४ निवासी इमारतींची किमान आवश्यक दुरुस्ती प्राधान्याने करण्यात आली असून उर्वरित इमारतींची दुरुस्ती निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती शहराला जोडणा-या अमरावती-बडनेरा या मुख्य मार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(९) * ५५७ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहराला जोडणाऱ्या अमरावती-बडनेरा (जि.अमरावती) या मुख्य रस्त्याची दूरवस्था होऊन वाहनचालकांसाठी सदर रस्ता अत्यंत धोकादायक झाला असल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावरुन प्रवास करतांना वारंवार अपघाताच्या घटना घडत असून नागरिकांना आपला जीव गमवावा लागत असल्याने सदर रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

परंतु रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम प्रगतीत आहे.

(२) या रस्त्यावरील कॉंक्रीटीकरणाचे काम त्वरीत पुर्ण करण्याचे उद्देशाने विभागामार्फत प्राधान्य क्रमाने कार्यवाही सुरु असून डांबरीकरणाचे काम मार्च-२०२० अखेर व कॉंक्रीटीकरणाचे काम मे-२०२० अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील नायगांव-पिंपळगांव-होटाळा-मुगांव रस्ता दुरुस्तीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(१०) * १४९५ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील नायगांव-पिंपळगांव-होटाळा-मुगांव या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात खदानीद्वारे बांधकाम साहित्याची व रेतीची वाहतूक होत असल्याने रस्ता वारंवार नादुरूस्त होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असून अपूर्णावस्थेत असल्याची तक्रार मा.लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाची उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामासाठी जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर रस्त्याची दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय. हे खरे आहे.

(२) अशा आशयाची श्री.माधव पाटील कल्याण, शिवसेना शहर प्रमुख नायगाव, ता.नायगाव, जि.नांदेड यांची दि.०७/१२/२०१९ रोजीची तक्रार दि.१४/०२/२०२० रोजी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांचे कार्यालयास प्राप्त झाली आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एरंडोल तालुक्यातील (जि.जळगांव) कढोली हद्दीतील धोबी नाला ते रवंजापर्यंतच्या रस्त्याच्या कामाबाबत

**(११) * ४२१८ श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल तालुक्यातील (जि.जळगांव) कढोली हद्दीतील धोबी नाला ते रवंजापर्यंतच्या ५ कि.मी. रस्त्याचे डांबरीकरणाचे काम विशेष दुरुस्ती योजनेंतर्गत सुरु असून सदर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी सदर रस्त्याचे काम थांबविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून सदर रस्त्याच्या निकृष्ट बांधकामास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व रस्त्याचे काम दर्जेदार होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही. प्रश्नाधीन रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून गुणवत्ता विषयक चाचण्यांचे अहवाल विनिर्देशाप्रमाणे आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आरे कारशेडसंदर्भातील समितीचा अहवाल जाहीर करण्याबाबत

**(१२) * १० श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे मेट्रो कारशेडच्या कामाला स्थगिती देत या कामांचा आढावा घेण्यासाठी समितीची घोषणा केली होती व पंधरा दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालावधी उलटूनही सदर समितीचा अहवाल अद्याप जाहिर केला नसल्याची माहिती दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवाल जाहिर न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने सदर समितीचा मेट्रो कारशेडसंदर्भातील अहवाल सादर करुन या प्रकल्पाला विलंब होऊन खर्च वाढणार नाही याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सदर समितीचा अहवाल शासनास दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी प्राप्त झाला असून सदर अहवाल शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## नागपाडा (मुंबई) येथील बगदादी कंपाऊंडमधील चायना इमारतीला लागलेली आग

**(१३) * ४३१ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपाडा (मुंबई) येथील बगदादी कंपाऊंडमधील चायना इमारतीच्या बी विंगमधील तळमजल्यावरील एका व्यावसायिक गाळ्यांमधील रसायने तसेच ज्वलनशील वस्तूमुळे लागलेल्या भीषण आगीत इमारतीचा भाग कोसळून आठ जण जखमी झाल्याची घटना दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून सदरहु आगीच्या घटनेची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मुंबई शहरातील बहुतांश इमारतीत साठविण्यात येत असलेल्या ज्वलनशील पदार्थामुळे व सदोष वीज जोडणीमुळे तसेच वीज तारांमुळे वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नागपाडा येथील बगदादी कंपाऊंडमधील चायना इमारतीच्या ए विंगमधील चार राहत्या रुममधील इलेक्ट्रीक वायरिंग, इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन, घरगुती सामान, कपडे व फर्निचर तसेच, एका चप्पल बनविण्याच्या कारखान्यातील सामानाचा साठा, केमिकल व एका गोडाऊनमधील ऑईलच्या साठ्याला व सदर इमारतीमधील बी विंगला दिनांक ०६.०१.२०२० रोजी सकाळी ९.१५ वाजता आग लागली होती.

सदर आगीच्या धुराचा ८ व्यक्तींना त्रास झाल्यामुळे त्यांना नायर रुग्णालयात दाखल करुन, उपचारानंतर त्यांना सोडण्यात आले.

सदर इमारतीच्या बी विंगमधील एलपीजी सिलेंडरचा स्फोट झाल्यामुळे इमारतीच्या छताचा काही भाग व तळमजल्यावरील छताचा काही भाग कोसळल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर आगीच्या दुर्घटनेची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, आगीचे कारण स्टॅटीक इलेक्ट्रीसिटी (Static Electricity) असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

ज्वलनशील पदार्थांमुळे व सदोष विजेच्या जोडणी/तारांमुळे वारंवार घडणाऱ्या आगींच्या घटनांना आळा घालण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत:-

• वीजपुरवठा करणाऱ्या संस्था/कंपन्यांना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या तरतुदीन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

• इमारतीत करण्यात येत असलेल्या पदार्थांच्या साठ्यावर आळा घालण्यासाठी सहाय्यक आयुक्त यांच्या पर्यवेक्षणाखाली बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वेगवेगळ्या आस्थापनांची विभाग कार्यालयातील अधिकारी व अग्निसुरक्षा अधिकारी यांच्यासमवेत तपासणी करण्यात येते.

• महानगरपालिकेच्या विविध विभाग कार्यालयांच्या हद्दीतील इमारतींची आग प्रतिबंधात्मक तपासणी करण्याकामी “फायर कॉम्पायन्स सेल” ची स्थापना करण्यात आली आहे.

• बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेमधून स्वयंसेवकांची निवड करुन आतापर्यंत ६००० स्वयंसेवकांना अग्निविमोचनाबाबतचे प्राथमिक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रभागांतील ओला कचरा जिरवून त्यापासून वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१४) * ६६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रभागांत उभारलेल्या ओला कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणाऱ्या २५ प्रकल्पात वीज निर्मिती होत नसल्याने शासनाचा १८ कोटी ५० लाख रुपये रकमेचा अपव्यय झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार वर्षांपासून ओल्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पाची दुरवस्था आणि कर रूपी पैशांचा अपव्यय झाल्याबाबत सजग नागरिक मंचच्या माध्यमातून सतत पाठपुरावा होत असतांना महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीजनिर्मिती करणाऱ्या एकूण कोणकोणत्या वीजनिर्मिती प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीवर आणि प्रकल्पावर झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने प्रत्यक्षात किती वीजनिर्मिती झाली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाची दिशाभूल करून झालेल्या पैशांचा अपव्यय आणि प्रकल्पाच्या दुरवस्थेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) • पुणे शहरात निर्माण होणारा कचरा जिरवण्याकरीता व निर्माण होणाऱ्या गॅसपासून वीजनिर्मिती करण्याकरीता पुणे महानगरपालिकेद्वारे पुणे शहरात विकेंद्रीत पध्दतीने एकूण २५ बायोगॅस प्रकल्प उभारण्यात आले होते.

• या प्रकल्पांच्या उभारणीकरीता रु.१७.८३ कोटी एवढा खर्च आलेला आहे.

• या प्रकल्पांत पूर्ण क्षमतेने कचरा जिरवला जात नसून काही प्रकल्प बंद असल्याची तक्रार सजग नागरी मंच यांनी मार्च, २०१९ मध्ये विचारलेली होती, हे खरे आहे.

• उपरोक्त प्रकल्पांपैकी काही प्रकल्प फेरनिविदा काढण्याकरीता व आवश्यक त्या तांत्रिक दुरुस्त्या करण्यासाठी बंद होते, ही वस्तुस्थिती आहे.

• हडपसर येथील २ प्रकल्प बंद असून पूर्णपणे दुरुस्त करुन नव्याने उभारावे लागणार असल्याने प्रकल्पाचे स्ट्रक्चरल ऑडीट केले असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

• तथापि, बंद प्रकल्पांबाबत आवश्यक कार्यवाही करुन धानोरी, फुलेनगर, रेल्वे म्युझियम, पेशवे पार्क येथील २ प्रकल्पांपैकी १ व वडगाव १ व २ हे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेले असून तेथे पूर्ण क्षमतेने कचरा जिरवण्यात येत आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• सद्य:स्थितीत पेशवे पार्क येथील १ व हडपसर येथील २ प्रकल्प सध्या बंद अवस्थेत आहेत.

(३) व (४) • ऑक्टोबर, २०१५ ते डिसेंबर, २०१९ पर्यंत कार्यान्वित असलेल्या एकूण प्रकल्पांमधून सुमारे १८५० मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात आलेली आहे.

• तसेच ऑक्टोबर, २०१५ ते डिसेंबर, २०१९ पर्यंत सदर प्रकल्पांमध्ये एकूण १४१४५५१ मे.टन ओला कचरा जिरवण्यात आलेला आहे.

• सदर कचरा प्रकल्पांचे तांत्रिक विश्लेषण/लेखा परिक्षण करण्याकरीता राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी व अनुसंधान संस्था (NEERI) या शासकीय संस्थेकडून लेखा परिक्षण केलेले आहे.

• सदर संस्थेने सुचविलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने योग्य त्या सुधारणा करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मलकापूर ते धरणगाव (जि.बुलढाणा) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१५) * २२३५ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर ते धरणगाव (जि.बुलढाणा) या रस्त्याची खड्ड्यांमुळे अतिशय दुरवस्था झाली असून वाहतुकीस अयोग्य झाला असल्याने सदर रस्त्यावर अपघाताचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले असल्याची बाब दिनांक १० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या खड्ड्यांची दुरुस्ती करून रस्त्याचे मजबुतीकरण आणि नूतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितील आहे. विषयांकित रस्त्याचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय महामार्ग क्र.६ मधिल अमरावती ते चिखली भागाच्या चौपदरीकरणाचा भाग असून सदर काम सन २०१६ मध्ये आय.एल.ॲण्ड एफ.एस. कंपनीमार्फत हाती घेण्यात आले होते. परंतु कंपनीच्या आर्थिक डबघाईमुळे जुलै २०१८ पासून सदर काम बंद पडले. तसेच सप्टेंबर २०१९ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे अस्तित्वातील रस्त्यावरील पाण्याचा निचरा न झाल्याने रस्ता क्षतिग्रस्त झाला होता, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(२) सदयस्थितीत रस्ता वाहतुकीयोग्य ठेवण्याच्या दृष्टिने प्राधिकरणामार्फत खड्डयांची आवश्यक व तातडीची दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच सदर कामाकरिता आय.एल.ॲण्ड एफ.एस. कंपनीसोबत केलेला करारनामा दि.०२.०८.२०१९ रोजी खंडीत करण्यात आला असून चौपदरीकरणाच्या मूळ उर्वरित कामाकरिता प्राधिकरणाच्या दिल्ली मुख्यालयाकडून निविदा मागविण्यात आल्या असून निविदा नियुक्तीबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर कामाबाबत एप्रिल २०२० पर्यंत करारनामा होणे अपेक्षित आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर महानगरपालिका येथे कार्यरत असलेल्या सफाई कामगारांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत

**(१६) * २७७५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिका येथे कार्यरत असलेल्या सफाई कामगारांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत वि.स.स. बल्लारपूर यांनी आयुक्त, चंद्रपूर

शहर महानगरपालिका यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय. चंद्रपूर महानगरपालिकेकडे दिनांक २३/१२/२०१९ रोजी असे पत्र प्राप्त झाले आहे.

(२) व (३) चंद्रपूर महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार, विषयाधीन निवेदनासोबत जोडलेल्या दिनांक ०२/१२/२०१९ च्या पत्रात एकूण ०८ मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. यातील मुद्देनिहाय उत्तर खालीलप्रमाणे :-

• मुद्दा क्र.०१ :- यातील २२ प्रकरणे शासन नियमाप्रमाणे अपात्र असून, त्यांना वारसाहक्काचा लाभ अनुज्ञेय होत नाही.

• मुद्दा क्र.०२:- यातील प्रकरणात, ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतली असून, एकूण सेवा २० वर्षापेक्षा कमी झाल्याने, लाड-पागे कमिटीच्या शिफारशी अंमलबजावणीच्या अनुषंगाने निर्गमित दि.१२/११/१९९४ नुसार त्यांचे वारसांना वारसाहक्क अनुज्ञेय होत नाही. तथापि, त्यांच्या घरातील अर्जदारांच्या पत्नीस त्यांच्या सासऱ्याच्या रिक्त जागेवर वारसा हक्काने सन २००३ मध्ये सफाई कामगार पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे.

• मुद्दा क्र.०३ :- यानुसार चंद्रपूर महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार सफाई कामगारांची ४६२ पदे मंजूर असून, प्रत्यक्षात ४७६ कर्मचारी कार्यरत आहेत. यातील १० सफाई कामगारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्रत्यक्ष पदोन्नती दिलेली असून, २८ सफाई कामगारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार टेबल वर्क व इतर कामे सोपविण्यात आलेली आहेत.

• मुद्दा क्र.०४ :- मंजूर पदांपेक्षा जास्त पदे कार्यरत आहेत.

• मुद्दा क्र.०५ :- सफाई कामगारांना दरमहा पगाराची स्लिप देण्यात येते.

• मुद्दा क्र.०६ :- पदोन्नती प्रकरणे निकाली काढताना कर्मचारी निवड समितीची मंजुरी घेऊन आदेश पारित करण्यात येत आहेत.

• मुद्दा क्र.०७ :- यातील ३४ कामगारांची सविस्तर माहिती विहित नमुन्यात पुराव्यानिशी ०७ दिवसात सादर करण्याबाबत, दिनांक ०२/१२/२०१९ च्या

पत्राचे निवेदकर्ते माजी जिल्हा सचिव, अखिल भारतीय सफाई मजदूर काँगेस, चंद्रपूर यांना दिनांक ०४/०२/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे. अद्याप सदरची माहिती महापालिकेकडे प्राप्त झालेली नाही.

• मुद्दा क्र.०८ :- या मुद्यानुसार दिनांक १३/०२/२०२० च्या पत्रान्वये निवेदनकर्ते यांना महापालिकेकडून कळविण्यात आले आहे.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) करीता मोशी येथे नवीन न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामास निधी उपलब्ध होणेबाबत

**(१७) * ३९२९ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) उद्योगनगरीतील मोरवाडी येथील न्यायालयाच्या इमारतीचे महानगरपालिकेने स्थापत्य विषयक लेखापरीक्षण करून सदर इमारत धोकादायक असल्याचे जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी चिंचवड मधील वकील, पक्षकार, नागरिक, लोकप्रतिनिधी, बार असोसिएशन यांनी राज्यशासनाकडे सातत्याने नवीन इमारत बांधण्याबाबत निवेदने दिली असुन पाठपुरावाही केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड प्राधिकरणाने पेठ क्र. १४ मोशी येथील १५ एकर जागा सन २००९ मध्ये नवीन न्यायालयाची इमारत बांधण्यासाठी न्यायालयाकडे हस्तांतरित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मोशी येथील नियोजित न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी उच्च न्यायालयाने मंजूर केलेला १२४ कोटी रुपयांचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करुन सदर न्यायालयाची इमारत बांधण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) पिंपरी चिंचवड येथे सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतीचे महानगरपालिकेकडून स्थापत्यविषयक लेखापरीक्षण करण्यात आले असून सदर इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत लेखापरीक्षकाने सूचित केले आहे.
(२) होय. पिंपरी चिंचवड येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे.
(३) होय. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या पेठ क्र.१४ येथील ६५७०० चौमी जागा विधि व न्याय विभागास हस्तांतरीत करण्यात आली आहे.
(४) व (५) होय. प्राप्त प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक मान्यता प्राप्त करण्यात आली असून, त्यानुसार रु.११७.४६ कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर महानगरपालिकेच्या थेट पाईपलाईन पाणीपुरवठा योजनेबाबत

**(१८) * ३४५२ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या थेट पाणीपुरवठा पाईपलाईन योजनेचा वाढीव खर्च ५०० कोटींवर पोहचूनही व ठेकेदारास २ वेळा मुदतवाढ देऊनही योजनेचे काम संथ गतीने सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठेकेदार जे.के.सी. कंपनीने आणखी १ वर्षाची मुदतवाढ मागितली असून अद्यापपावेतो दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ रोजी वर्कऑर्डर देऊनही आजतागायत योजनेचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे दिवसेंदिवस योजनेचा खर्च वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुधगंगा धरण क्षेत्रातील जॅकवेलचे काम आणि सोळांकूर येथील पाईपलाईनचे काम वेळेत पूर्ण करून कोल्हापूर वासियांना शुध्द व मुबलक पाणी मिळावे तसेच या योजनेमुळे बाधित झालेले रस्ते व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) केंद्र शासनाच्या UIDSSMT या कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर शहराची भविष्यातील शुध्द पाणीपुरवठ्याची गरज भागविण्याकरीता काळम्मावाडी धरण जलाशयातून थेट पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याची योजना असून सदर योजनेच्या स्विकृत निविदेची किंमत रु. ४८८.७४ कोटी इतकी आहे.

• सदर योजनेचा कार्यारंभ आदेश दिनांक २२/०८/२०१४ रोजी देण्यात आला असून योजना पुर्ण करण्याची मुळ मुदत दि.२१/११/२०१६ पर्यंत होती. तद्नंतर सदर योजनेस दि.३१/०५/२०१८ पर्यंत पहिली वाढीव मुदतवाढ व दि.३१/१२/२०१९ रोजीपर्यंत दुसरी वाढीव मुदतवाढ देण्यात आली.

• विविध विभागाच्या परवानग्या वेळेत प्राप्त न झाल्याने, पाईपलाईन मार्गामधील ग्रामपंचायत हद्दीतील अडचणी व विरोध तसेच विजेचे खांब व डी.पी. शिफ्टींगच्या कामास झालेला विलंब यामुळे सदर योजना मुळ व वाढीव मुदतीत पुर्ण होऊ शकली नसून उक्त कारणांमुळेच कंत्राटदाराने पुन:श्च १ वर्षाच्या मुदतवाढीची मागणी केली आहे, अशी वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.

• सदर योजनेच्या स्विकृत निविदेमध्ये भाववाढीच्या अटींची तरतुद नसल्याने मंजूर रक्कमेच्या मर्यादेतच कंत्राटदारास प्रकल्प पूर्ण करण्याचे बंधन आहे, असे कोल्हापूर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) दुधगंगा धरण क्षेत्रातील जॅकवेलच्या खोदाईचे काम तसेच, अनुषंगीक तांत्रिक बाबींची कामे (काही अंतर्गत कामे वगळता) पूर्ण झाली आहेत. हेडवर्क्सचे काम सुरु करण्यासाठी धरणातील पाण्याची पातळी कमी करणे आवश्यक असल्याने याबाबत महानगरपालिकेकडून कोल्हापूर पाटबंधारे विभाग यांच्याकडे पाठपुरावा सुरु आहे.

• सोळांकूर ग्रामस्थांच्या विरोधामुळे तेथील पाईपलाईनचे काम सुरु करणे शक्य झाले नाही. यासंदर्भात ग्रामस्थांशी वारंवार चर्चा सुरु असून सदरचे काम सत्वर सुरु करण्याचे महानगरपालिकेचे प्रयत्न आहेत.

• स्विकृत निविदेनुसार पाईपलाईनच्या कामांमुळे बाधीत झालेल्या काही रस्त्यांची दुरुस्ती संबंधित कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आली आहे.

• जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मान्यता घेऊन त्यांच्या हद्दीतून पाईपलाईन टाकण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घोडबंदर रोड (ठाणे) येथील ओवळा मोघरपाडा मेट्रो कारशेडचा सर्व्हे करताना शेतकऱ्यांना विश्वासात न घेतल्याबाबत

**(१९) * १८७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील घोडबंदर रोड येथील ओवळा मोघरपाडा येथे खारभूमी जागेत मेट्रो प्रकल्पासाठी एमएमआरडीएने मेट्रो कारशेडचे आरक्षण टाकले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारशेडसाठी सुमारे १०० एकर जागा एमएमआरडीएला आवश्यक असून एमएमआरडीएचे अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय यांनी शेकडो पोलीसांच्या बंदोबस्तात मेट्रो कारशेडचा सर्व्हे करत असताना शेतकऱ्यांना विश्वासात न घेतल्याने या सर्व्हेला स्थानिकांनी तीव्र विरोध केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शेतक-यांना योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांचे पूर्ण समाधान होवून, त्यांना न्याय द्यावा व त्यानंतर पुढे कारशेडचे काम सुरु करा व अशी स्पष्ट भूमिका शेतकऱ्यांकडूनच घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) ठाणे येथे मेट्रो कारशेडकरीता मौजे. मोघरपाडा येथील सर्व्हे नं. ३० या मिळकती पैकी शासकीय जमिनीवर कारडेपो व पोचमार्गाकरीता सर्व्हे नं. २७, २८ व २९ असे एकूण ४१.५ हे.आर. क्षेत्र प्राधिकरणामार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने मौजे मोघरपाडा येथील जमिन मेट्रो कारशेडकरीता आरक्षित करण्यासाठी मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

मौजे मोघरपाडा येथील सं.नं ३० या जमिनीचे दिनांक ०६.०१.२०२० रोजी मोजणीची तारीख निश्चित करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष मोजणी दरम्यान शेतकरी / ग्रामस्थांनी सदर जागेची संपूर्ण मोजणी करुन त्यांच्या ताब्यातील क्षेत्र नकाशावर सिमांकित करावे तसेच मोबदला निश्चितीबाबत बैठक घेण्यात यावी, तद्नंतर मोजणीची कार्यवाही करावी अशी मागणी केल्याने मोजणीची कार्यवाही झाली नाही.

मौजे मोघरपाडा येथील स.नं. ३० या मिळकतीची मोजणी झाल्यानंतर वाटप केलेले क्षेत्र, सरकारी अतिक्रमणित क्षेत्र व शिल्लक क्षेत्र याबाबतची माहिती प्राप्त झाल्यानंतर मोबदला निश्चिती संदर्भात संबंधित विभागांच्या समन्वयाने निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

-----------------

## उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील उमरखेड-तिवडी-टाकळी राजापूर या रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याबाबत

**(२०) * ३३४१ श्री.नामेदव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील उमरखेड-तिवडी-टाकळी-राजापूर या रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली असून या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबतचे लेखी निवेदन माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान उपविभागीय अधिका-यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनानुसार या क्षतिग्रस्त रस्त्यांची दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) उमरखेड ते तिवडी हा इजिमा दर्जाचा २०९ क्रमांकाचा रस्ता असुन रस्त्याची एकूण लांबी ९.०० कि.मी. आहे. सन २०१८-१९ मध्ये DPC अंतर्गत रु. ५०.०० लक्ष किंमतीचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांचेकडे मंजुर असून दुरुस्तीचा वाव कि.मी. ४/०० ते ५/५०० असा आहे. सद्यस्थितीत कामाचे ठिकाणी १.०० कि.मी. लांबीचे BBM चे काम पुर्ण झाले असून उर्वरीत ०.५० कि.मी. खडीकरणाचे काम प्रगतीत आहे.

टाकळी राजापूर उमरखेड रस्ता हा इजिमा दर्जाचा २०७ क्रमांकाचा रस्ता असून, लांबी ७.९० कि.मी. आहे. या रस्त्यावर दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात येऊन रस्ता वाहतुकीस सुरळीत करण्यात आला आहे.

-----------------

## मनमाड शहराकरिता मंजूर असलेली कायमस्वरूपी करंजवन धरण शाश्वत उद्भव पाणी पुरवठा जलयोजना मंजूर झाल्याबाबत

**(२१) * १३७५ श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत १ लाख ३० हजार लोकसंख्या असलेल्या मनमाड (ता.नांदगाव) शहराकरिता कायमस्वरूपी करंजवन धरण शाश्वत उद्भव पाणी पुरवठा ही ३०० कोटीं रुपयांची जलयोजना मंजूर झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा विभाग यांनी मनमाडच्या नागरिकांचा पाण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करंजवन धरणातून मनमाड शहरास पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास प्रतीव्यक्ती १३५ लिटर्स पाणी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मनमाड नगरपालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने सदर योजना राबविणेसाठी शासन स्तरावरून प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मनमाड शहरासाठी तसेच मार्गस्थ असलेली २४ गावे मिळून प्रस्तावित असलेली करंजवन-मनमाड जलयोजनेच्या कामाची सध्यस्थिती काय आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) • मनमाड शहरातील नागरिकांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासंदर्भात करंजवण धरण शाश्वत उद्भव विचारात घेऊन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित आहे.

• सदरील योजनेसंदर्भात मनमाड नगरपरिषदेमार्फत ठराव पारित करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

• सदरील प्रकल्पाबाबत विविध बाबी विषयीची कार्यवाही मनमाड नगरपरिषदे मार्फत चालू आहे.

• दिनांक २०.०६.२०१९ च्या आढावा बैठकीत मा.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या निर्देशानुसार नांदगाव व येवला शहरांना करंजवन योजनेतून पाणी पुरवठा करता येण्याच्या शक्यतेबाबत सविस्तर अहवाल तयार करण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दिलेले होते.

• त्यास अनुसरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे मनमाड शहर व मार्गस्थ २४ गावांच्या पाणीपुरवठा संदर्भात पूर्व व्यवहार्यता अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे सादर केला आहे.

• हा पूर्व व्यवहार्यता अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

# मुंबईतील माझगांव, ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(२२) * १५९३ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव, ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींचा पुनर्विकास प्रकल्पाचे इरादा पत्र मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारासच्या पत्रान्वये रद्द केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इरादा पत्र रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरचा पुनर्विकास प्रकल्प मार्गी लागून बी.आय.टी. चाळींतील विस्थापित झालेल्या कुटुंबांना पुन्हा पुनर्विकसीत इमारतीत सदनिका मिळण्याच्या दृष्टीने शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी सहकारी गृहनिर्माण संस्थेने नियुक्त केलेल्या विकासकास दिनांक १६.०५.२००८ रोजी इरादापत्र देण्यात आले होते.

सदर इरादापत्र रद्द करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

• विकासकाने इरादापत्रातील आवश्यक त्या अटींची पूर्तता केली नाही.

• पुनर्विकासात लक्षणीय प्रगती झाली नाही.

• सदर ठिकाणच्या विद्यमान इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विकासकाशी पाठपुरावा व वेळोवेळी पत्रव्यवहार केल्यानंतर सुध्दा विकासकामार्फत दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

सदर इरादापत्र रद्द केल्याप्रकरणी विकासकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ३४४१/२०१८ दाखल केली असून, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) माझगांव ताडवाडी बी.आय.टी. चाळ निवासी वसाहत बचाव कृती समितीने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक ३९११४/२०१२ मध्ये हस्तक्षेप अर्ज क्रमांक ११८५३२/२०१८ अन्वये, बी.आय.टी. चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. सदर याचिकेवरील सुनावणी प्रलंबित आहे.

तथापि, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ अंतर्गत विनियम ३३(७) नुसार महापालिकेच्या रहिवाशांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने सर्वसाधारण सभेत एकमताने ठराव संमत करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेस पुनर्विकास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

तसेच, इरादापत्र रद्द केल्यानंतर सदर ठिकाणच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत आजपर्यंत नवीन पुनर्विकास प्रस्ताव सादर करण्यात आला नसल्याचे बृहन्मंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) सिडको हद्दीतील वसाहतीमधील जीर्ण झालेल्या जलवाहिनीतून होणारा दुषित पाणी पुरवठा

**(२३) * १४८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) सिडको हद्दीतील वसाहतीमधील २५ वर्षाहून अधिककाळ वापरात असलेल्या जीर्ण झालेल्या जलवाहिनीतून होणाऱ्या दुषित पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीर्ण झालेल्या जल वाहिन्यांतून होणाऱ्या गळतीमुळे पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागात जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम सिडको प्रशासनाने सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन जलवाहिन्या टाकण्याच्या कामाकडे सिडको प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जलवाहिन्यातून पाणी गळती होऊन नागरिकांना अस्वच्छ पाणीपुरवठाही होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवीन जलवाहिन्या टाकण्याच्या कामाकडे दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), व (३) कळंबोली नोडमधील सेक्टर-१ मधील काही भागामध्ये गळती झालेल्या मल:निस्सारण वाहीनीचे दुषित पाणी, त्या भागातील रहिवाश्यांना पाणीपुरवठा करणा-या नळजोडणीचे (फेरुल) एका ठिकाणी सैल असल्याने त्यामध्ये मिश्रीत झाले होते. सदर मल:निस्सारण वाहीनीची तत्काळ साफसफाई करुन त्यातुन होणारी गळती बंद करण्यात आली आहे. तसेच पाणीपुरवठा करणा-या नळजोडणीची (फेरुल) सुद्धा दुरुस्त करण्यात आले आहे.

तसेच कळंबोली नोडमधील सेक्टर-२, ३, ३ई, ४ई व ६ई या ठिकाणी सिडकोने बांधलेल्या वसाहतीमध्ये कंडोमिनियमच्या आवारातील पाणीपुरवठा करणा-या जलवाहिन्या बदलविण्यात आलेल्या असून जलवाहिन्यांमधून पाणी गळतीद्वारे रहिवाश्यांना अस्वच्छ पाणी पुरवठा होणार नाही याबाबत काळजी घेण्यात येत आहे.

(४) नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी शहरास जोडणाऱ्या चारही प्रमुख रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * १०४ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील रस्त्यांच्या झालेल्या दुरवस्थेसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाने ७१/२०१३ या जनहित याचिकेवर सुनावणी करुन दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निकालात रस्त्यांवरील खड्डे तात्काळ दुरुस्त करुन सुरु असलेल्या कामांची माहिती संबंधित ठिकाणी सर्व माहितीसह फलक लावावे असे मा.न्यायालयाचे आदेश असूनही ही बाब सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्षीत केली असल्याची माहीती दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे परभणी शहरात येण्यासाठी असलेल्या परभणी ते गंगाखेड, परभणी ते मानवत रोड, परभणी ते जिंतूर, परभणी ते वसमत या चारही रस्त्यांची स्थिती अत्यंत दयनीय असून सद्यस्थितीत रस्त्यांची कामे अत्यंत संथगतीने सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संथगतीने सुरु असलेल्या कामामुळे रस्त्यांवर खड्डे पडले आहेत, यामुळे वाहनधारकांना वाहन चालविताना अत्यंत गैरसोयीचे होत असून अपघात होण्याचीही शक्यता वाढली आहे, त्यामुळे सदर महामार्गाची दुरुस्ती तातडीने करण्यात यावी अशी मागणी वारंवार संबंधित विभागाकडे वाहनधारक, प्रवासी व लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली असतांनाही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर रस्त्याची पाहणी करुन सदर चारही प्रमुख मार्गाची दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

परभणी ते गंगाखेड-सदर रस्त्याचे मजबूतीकरण व पुनर्बांधणीच्या कामाकरिता ३० जून, २०१८ अन्वये कंत्राटदार सर्जन इन्फ्राकॉम प्रा.लि., अहमदाबाद यांना दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार सुरु करण्यात आलेल्या कामास मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याअभावी गती मिळालेली नसल्याने काम संथगतीने सुरु होते. तथापि सप्टेंबर २०१९ पासून सदर काम

जलद गतीने प्रगतीपथावर असून आजमितीस सुमारे ४० टक्के काम भौतिकदृष्टया पूर्ण झाले आहे व उर्वरित काम येत्या ६ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

परभणी ते जिंतूर-सदरहू नविन रा.म.क्र. ७५२ के या रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरण कामास मे.ऋत्वीक प्रोजेक्ट प्रा.लि. यांना दि.२०.०९.२०१७ रोजी दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार सदर काम प्रगतीपथावर असताना तेथील स्थानिक नागरीकांनी ब-याच वेळेस काम बंद केल्याने, रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे तोडण्यासाठी परवनागीस झालेला विलंब व तेथील विदयुत/पाणीपुरवठा वाहिन्यांचे स्थलांतर वगैरे कारणांमुळे कामास प्रामुख्याने विलंब झाला. तसेच ठेकेदाराच्या आर्थिक अडचणीमुळे काम सुमारे ४ महिने बंद असल्याने देखिल विलंब झाला आहे. तथापि सदर महामार्गाचे बांधकाम दि.२५.०५.२०१९ पासुन सुरु करण्यात आले असून एप्रिल २०२० पर्यंत शिघ्रगतीने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

परभणी ते मानवत रोड व परभणी ते वसमत-सदर रस्त्यांची सुधारणा व पुनर्बांधणीच्या कामाकरिता दि.१४ एप्रिल,२०१७ अन्वये कंत्राटदार मे.गॅनन ॲण्ड डनकर्ली मुंबई यांना दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार सुरु करण्यात आलेले काम आजमितीस सुमारे २५ टक्के पूर्ण झाले आहे. तथापि सदर काम शिघ्र गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टिने कंत्राटदारास केंद्र शासनामार्फत मार्च २०२० पर्यंत ठराविक उद्दिष्ट देण्यात आले आहे.

(३) परभणी ते गंगाखेड-सदर रस्त्यावरील वेळोवेळी खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुरळीत व सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टिने योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे.

परभणी ते जिंतूर-सदर महामार्गाचे प्रलंबित बांधकाम दि.२५.०५.२०१९ पासुन सुरु केल्यानंतर खड्डे भरण्याचे काम करण्यात आले होते. परंतु या वर्षी जास्त प्रमाणात पाऊस झाल्यामुळे ते खड्डे पूर्ण उखडून गेल्याने सदर खड्डे बुजविण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरु आहे.

परभणी ते मानवत रोड व परभणी ते वसमत-अस्तित्वातील डांबरी पृष्ठभागावर वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टिने खड्डे दुरुस्ती करण्यात आली आहे व उर्वरित नव्याने निर्माण झालेले खड्डे दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) सदर रस्त्यांची कामे शिघ्र गतीने प्रगतीपथावर असून लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महामेट्रोचे विस्तारीकरण शिरुर तालुक्यातील शिक्रापुर पर्यंत करण्यास मंजूरी मिळण्याबाबत

**(२५) * ४३७२ श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.अण्णा बनसोडे (पिंपरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश प्राधिकरणाने हाती घेतलेल्या महामेट्रो विस्तारणीकरणामध्ये निगडी-कात्रज, चांदणी चौक-वाघोली, माण-लोणी काळभोर पर्यंत मेट्रोच्या कामाला मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरालगत मोठ्या गावामध्ये वाढत्या नागरीकरणामुळे शिरुर तालुक्यातील शिक्रापुरपर्यंत मेट्रोच्या कामास मंजूरी मिळण्याबाबत नागरीकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) पुणे महानगर परिक्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी अभ्यास करुन तयार करण्यात आलेल्या सर्वकष वाहतुक आराखड्यात प्रश्नाधिन भाग-१ मधील मार्गावर मेट्रो मार्गिकांची शिफारस करण्यात आली आहे.

या मार्गिकांपैकी  निगडी ते कात्रज दरम्यान स्वारगेट-पिंपरी-चिंचवड-निगडी मेट्रो मार्गिका तसेच चांदणी चौक ते वाघोली दरम्यान वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गिका या प्रकल्पाची अंमलबजावणी महा मेट्रोमार्फत करण्यात येत असुन सदर मार्गिकांचे काम प्रगतीपथावर आहे. माण ते लोणी काळभोर दरम्यान हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सार्वजनिक खाजगी सहभागातून करण्यात येत आहे.

पुणे महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था सुधारण्याच्या अनुषंगाने मेट्रो प्रकल्पांची टप्याटप्याने अंमलबजावणी करण्यासाठी प्राथमिक प्रकल्प अहवाल / सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची बाब तपासण्यात येत आहे.

-----------------

## जळगाव येथील कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग यांची बनावट स्वाक्षरी करुन शासनाची केलेली फसवणूक

**(२६) * ३१८१ श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.भालचंद्र तळेले यांनी कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम उत्तर विभाग, जळगांव यांची नोंदणी प्रमाणपत्रावर बनावट स्वाक्षरी करुन तसेच श्र. तळेले व सचिन भोंबे यांनी श्री.ए.आर.तडवी, आझाद बिल्डींग वर्कशॉप यावल, (ता.यावल, जि.जळगाव) यांच्या नावाने बनावट देयके तयार करुन कोट्यवधी रुपयांची शासनाची फसवणूक केल्याप्रकरणीचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (उत्तर), जळगांव यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) श्री.भालचंद्र रामकृष्ण तळेले, जळगाव यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे सादर केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राची पडताळणी केली असता सदर नोंदणीपत्र योग्य नसल्याबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड, मुंबई यांनी श्री.भालचंद्र रामकृष्ण तळेले, जळगाव यांना तोंडी समज देऊन निविदेमध्ये अपात्र ठरविले आहे.

श्री.सचिन भोंबे, कंत्राटदार, मुक्ताईनगर यांनी करारनाम्यावर जोडलेल्या आझाद वेल्डींग वर्कशॉप, यावल, जि.जळगाव यांची बिले बनावट आढळल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली असून नव्याने निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडवणी नगरपंचायत (जि.बीड) यांनी बंदीस्त नालीच्या कामात केलेला गैरव्यवहार

**(२७) * ८७९ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवणी नगरपंचायत (जि.बीड) यांनी बंदीस्त नालीच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याप्रकरणी श्री. दिलीप भिवाजी आवचर रा.वडवणी (जि.बीड) यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ व दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) वडवणी नगरपंचायत (जि.बीड) यांनी शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय, बीड यांना बंदीस्त नालीच्या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण (Third

Party Technical Audit) करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले असल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवालात नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विद्‌याविहार पुर्व-पश्चिम उड्डाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२८) * १८७० श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विद्‌याविहार पुर्व पश्चिम उड्डाणपुलाचे काम गत दोन वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे वाहनांना ३ ते ४ कि.मी. चा वळसा घालून जावे लागत असल्यामुळे घाटकोपर महात्मा गांधी मार्गावर वाहतुक कोंडी निर्माण होत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाचे काम गत दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याने त्वरीत पुर्ण करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबीं लक्षात घेता सदर प्रलंबित काम पूर्णत्वास नेण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक २१.११.२०१९ रोजीच्या गुजराती मिड-डे या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर पुलाचे काम करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागाराने दिलेला पुलाचा सर्वसाधारण आराखडा माहे जून २०१६ मध्ये मध्य रेल्वेकडून मंजूर करुन घेण्यात आला.

त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया राबवून माहे एप्रिल, २०१८ मध्ये कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले होते.

तद्नंतर माहे मे, २०१८ मध्ये तांत्रिक सल्लागाराने दिलेले रेल्वेवरील गर्डरचे संकल्पचित्र (डिझाईन) आय.आय.टी. पवई यांचेकडे फेर तपासणीसाठी दिले.

रेल्वेने सदर संकल्पचित्रामध्ये त्रुटी दाखवून दिल्यानंतर, सदर संकल्पचित्रामध्ये सुधारणा करुन माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये गर्डरचे संपूर्ण डिझाईन रेल्वेकडे सादर केले.

तसेच तांत्रिक सल्लागाराने दिलेल्या व रेल्वेने मंजूर केलेल्या पुलाच्या सर्वसाधारण आराखड्यामध्ये रेल्वेने सुधारणा सुचविल्या.

त्यानुसार सदर पुलाचा सुधारीत सर्वसाधारण आराखडा महानगरपालिकेमार्फत माहे जानेवारी, २०२० मध्ये रेल्वेकडे सादर करण्यात आला.

तथापि, सदर गर्डरचे डिझाईन व पुलाचा सर्वसाधारण आराखडा रेल्वेमार्फत अद्यापि अंतिम करण्यात आला नसल्यामुळे विद्याविहार पूर्व पश्चिम उड्डाणपुलाचे काम प्रलंबित आहे.

सदर गर्डरचे डिझाईन व पुलाचा सर्वसाधारण आराखडा रेल्वेमार्फत अंतिम करण्यात आल्यानंतर पुलाचे काम नियुक्त कंत्राटदारामार्फत सुरु करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## मौजे अंजनवेल भोईवाडी (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील लोकवस्तीचे समुद्राच्या लाटांमुळे होत असलेले नुकसान

**(२९) * ११२८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंजनवेल भोईवाडी (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) येथील समुद्रकिनारी सुमारे ३०० हून अधिक लोकांची लोकवस्ती असून समुद्राला येणाऱ्या उधाणांमुळे पाण्याच्या लाटा वस्तीत शिरून घरे, बागा तसेच मच्छीमार जाळी व इतर साहित्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाचे होत असलेल्या दुर्लक्षामुळे येथील नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन नुकसानग्रस्तांना मदत देण्यासह कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अशंत: खरे आहे
(२) नाही
(३) अंजनवेल, भोईवाडी येथे कायमस्वरुपी धुपप्रतिबंधक बंधारा बांधण्याची सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित असून निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिका सर्वे नंबर २३२ व ७३३/२ब/१ या जागेच्या टीडीआर वितरणात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३०) * २८ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत सर्वे नंबर २३२ मधील २५ एकर जागेच्या टीडीआर वितरणात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१ यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वे क्रमांक ७३३/२ब/१ या सर्वे नंबर च्या टीडीआर वितरणाच्या प्रक्रियेत सुध्दा अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आयुक्त, नाशिक महानगरपालिका व दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१ यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने टीडीआर वितरणात झालेल्या अनियमितता व गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आलेली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) प्रश्नाधीन दोन्ही प्रकरणांमध्ये महानगरपालिका स्तरावर तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(३) जमीन मालक / विकासक यांच्या प्रस्तावाची छाननी करुन हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) प्रदान करणेच्या शक्ती आयुक्त, महानगरपालिका यांना आहेत. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून पडताळणी करणेत आलेली असून टिडीआर वितरणामध्ये अनियमितता झाल्याचे दिसून येत नसल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे. शासन स्तरावर चौकशीची बाब नाही.
(४) लागू नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा संकुलांच्या ठेकेदारांकडे थकीत असलेली थकबाकी वसूल करणेबाबत

**(३१) * १२८८ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर आणि उपनगरात महानगरपालिकेची ६० क्रीडा संकुले आहेत, त्यातील सर्व ठिकाणी ठेकेदार नेमले असून नियमावलीनुसार महिन्याकाठचे निश्चित केलेले भाडे मुदतीत भरणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१९ अखेर या संकुलांच्या ठेकेदारांकडे एकूण २ कोटी १६ लाख रुपये थकबाकी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार थकबाकी वसूल करण्याबाबत व याप्रकरणी विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) • पुणे महानगरपालिकेच्या मालकीची एकूण ५३ क्रीडा संकुले व ५ क्रीडांगणे आहेत.

• पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली मधील तरतुदीनुसार ३ वर्षे मुदतीकरीता मुल्यांकन करुन वार्षिक भाडे निश्चित करुन संबंधीत ठेकेदारास सदर भाडे प्रतिमहा आकारले जाते.

• आकारण्यात येणारे भाडे महिन्याच्या अखेरीस अदा करणे ठेकेदारास बंधनकारक आहे.

• एकूण क्रीडा संकुलांपैकी काही ठिकाणी ठेकेदार नेमलेले असून काही क्रीडा संकुले दुरुस्तीच्या कामामुळे बंद अवस्थेत आहेत.

• या क्रीडा संकुलांपैकी ३९ क्रीडा संकुलांची जानेवारी २०२० पर्यंतची रु.२,५८,३४,५६३/- प्रलंबित आहे, हे खरे आहे.

(३) व (४) • थकबाकीची वसुली करण्याच्या दृष्टीकोनातून संबंधीत ठेकेदारांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली तरतुदीनुसार वेळोवेळी नोटिस देण्यात आली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

• क्रीडा संकुलांच्या ज्या ठेकेदारांनी भाडे थकविलेले आहे अशा ठेकेदारांकडून थकीत भाड्याची रक्कम आवश्यकता भासल्यास संबंधीतांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करुन तात्काळ वसूल करण्यात यावी, असे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना निदेश दिलेले आहेत.

-----------------

## हिंगोली ते औंढा (जि.हिंगोली) या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(३२) * ९२४ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली ते औंढा (जि.हिंगोली) या रस्त्याचे गत अनेक महिन्यांपासून सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामात अनेक ठिकाणी खोदून ठेवलेल्या खोदकामातील मातीही वापरली जात असून काही ठिकाणी खालच्या पातळीमध्ये गिट्टीसोबत सिमेंटचे पाणी टाकण्याऐवजी मातीचाच वापर करण्यात येत असून काही ठिकाणी मुरूमाचे दगड भरले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही. तथापि, अशा स्वरूपाची तक्रार माहे, नोव्हेंबर २०१९ मध्ये प्राप्त झाली होती.

(२) व (३) सदर तक्रारीची चौकशी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड अंतर्गत चौकशी समिती नियुक्त करण्यात आली असून चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हुन्नूर-पाटखळ (जि.सोलापुर) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३३) * ४०४९ श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुन्नूर-पाटखळ (जि.सोलापुर) या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहतुकीकरीता सदर रस्ता धोकादायक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच नंदेश्वर, हुन्नूर-पाटखळ या तीर्थ क्षेत्रांना पाटखळ, भोसे, मंगळवेढा, या चार गावांना जोडणारा मोठा रस्ता आहे, परंतु या रस्त्याचीही अतिशय दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु रस्त्यांची पाहणी करून रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित पाटखळ हुन्नर रस्ता हा रा.मा.३९१ चा भाग आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी २२.०० कि.मी. असून या लांबीत रस्त्यावर पडलेले खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) विषयांकित रस्त्यावर पाटखळ नंदेश्वर भोसे हुन्नूर या ठिकाणी ग्रामीण तिर्थक्षेत्र असल्याने वाहतुकीचे प्रमाण जास्त आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले असून वाहतूक सुरळीत सुरु आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदपूर (जि.लातूर) शहरातील ग्रामीण रुग्णालय परिसरातील ट्रामा केअर सेंटर इमारतीच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत

**(३४) * ७४८ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर (जि.लातूर) शहरासह तालुक्यातील रुग्णांना वेळेवर आरोग्य सेवा मिळावी म्हणून येथील ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात ट्रामा केअर सेंटरची इमारत उभारण्यात आली असून या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन तीन वर्षे झाली परंतु अद्यापही या इमारतीमधून आरोग्य सेवा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ट्रामा केअर सेंटरच्या इमारतीतील काही ठिकाणी छतातुन गळती होत असून काही खोल्यांमधील फरशीही निघालेली आहे तसेच शस्त्रक्रिया गृहासाठी वॉश बेसिनची, पाण्याची व ड्रेनेजची व्यवस्था नसल्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्राद्वारे कळविले असल्याची माहिती वैद्यकीय अधिक्षक डॉ.सुरजमल सिंह यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू इमारतीच्या बांधकामामध्ये संबंधित विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार यांनी संगनमताने गैरव्यवहार करून निकृष्ट दर्जाचे बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही. ट्रामा केअर सेंटर इमारतीचे काम पूर्ण करुन हस्तांतरीत करण्यात आले आहे व इमारत वापरात आहे.
(२) हे खरे नाही. ट्रामा केअर सेंटर इमारतीतील छत गळती, फरशी, शस्त्रक्रिया गृहासाठी वॉश बेशिन, पाणी पुरवठा व मलनिस्सारण व्यवस्था यांची आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत इमारत सुस्थितीत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील व मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांच्या वाहनांना टोलमधून वगळण्याबाबत

**(३५) * ३४४४ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध टोलनाक्याच्या निविदा प्रकिया करण्यात आल्या, त्यावेळी ५ कि.मी.च्या अवती भोवती असलेल्या रहिवाश्यांच्या वाहनांना या टोलमधून वगळण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून तशा निविदेमध्ये अटीही घालण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलुंड पूर्व येथील हरिओम नगर ही वसाहत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असून त्यास सर्व सेवा-सुविधा मुंबई

महानगरपालिका पुरविते, तसेच ही वसाहत टोल नाक्यानंतर येत असल्याकारणाने तेथील रहिवाशांना नाहक टोल भरावा लागतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हरिओम नगर येथील रहिवाश्यांना सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन मुलुंड हे असून दैनंदिन गरजेच्या वस्तूंसाठी, शाळा तसेच वैद्यकीय मदतीकरिताही मुलुंड येथे यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रमाणेच मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दहिसर येथिल रहिवाश्यांनाही टोल भरावा लागतो त्यामुळे रहिवाश्यांच्या वाहनांना संबंधित टोल नाक्यावरुन सवलती मिळाव्यात यासाठी टोल नाक्यांवर स्थानिक नागरीकांनी व लोकप्रतिनिधींनी वारंवार आंदोलनेही केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत निर्णयात्मक कार्यवाही करुन उक्त दोन्ही शहरातील नागरीकांना संबंधित टोल नाक्यातून सवलत देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७.०६.२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिनांक १ डिसेंबर २०१३ पासून हरिओमनगर, मुलुंड (पूर्व) येथील रहिवाशांनी आवश्यक कागदपत्रे पुरावा म्हणून दाखल केल्यानंतर, पथकर अधिसूचनेप्रमाणेच्या मुलुंड (पूर्व) येथील टोलनाक्याकरीता सध्याचा मासिक पासचा दर कमी करुन तो फक्त त्या दराच्या २५ टक्के इतक्या सवलतीच्या दराने त्यांना आकारण्यात उद्योजकाकडून E.T.C/R.F.I.D. देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सदर पथकर नाक्यावर सवलतीच्या दराने पथकर पासेस उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) मुलुंड हरीओम नगर येथील रहीवाशांच्या वाहनांना वरीलप्रमाणे सवलतीच्या दराने पथकर पासेस उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. मुलुंड (पूर्व), दहीसर, मिराभाईंदर या क्षेत्रातील रहीवाशांच्या वाहनांना पथकरातून सवलत देण्याची तरतूद शासन अधिसूचनेमध्ये नाही. अशा प्रकारची सवलत देणे ही एक धोरणात्मक बाब आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बिरवाडी आणि वरंध (ता.महाड, जि.रायगड) येथील अनेक गावांना जोडणा-या पुलाची दुरवस्था झाली असल्याबाबत

**(३६) * २६०६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) ऐतिहासिक बाजारपेठ असलेल्या बिरवाडी आणि वरंध येथील अनेक गावांना जोडणारा जुना पुल अत्यंत जीर्ण झाला असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार उक्त पुलाच्या पुनर्बांधणीबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, पुलाच्या कामाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही,
तथापि, सदर पुल काही ठिकाणी नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर पुलाची दुरुस्ती करण्यात येत आहे.

(२) सदर पूलाचे सन २०१८-१९ मध्ये स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, पुलाच्या पाया क्र.२, ४, ६ व ९ ची दुरुस्ती करणे तसेच पुलाचे स्लॅब क्र.३, ५, ६ व ७ ची किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रश्नांकित पुलाच्या बाजूला नवीन दुपदरी पूल बांधण्याचे काम नाबार्ड अंतर्गत मंजूर आहे. निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) नविन पुलाच्या कामाकरीता नाबार्ड-२३ अंतर्गत रु.५०९.८५ लक्ष इतका निधी मंजूर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यातील मालेगांव ते डाव्हा या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३७) * ३८१९ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यातील मालेगांव ते डाव्हा या रस्त्याची दुरवस्था झाली असून येथे मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहनचालकांकरिता वाहन चालविणे अतिशय धोकादायक झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आगामी होणा-या श्रीनाथ जंगे महाराजांच्या यात्रा महोत्सवाकरीता येणा-या भाविकांना त्रास व गैरसोय होवू नये यासाठी सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) मालेगांव ते डाव्हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३-क दि.०७.११.२०१८ पासून केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारित आहे.

सदर रस्ता वाहतूकीयोग्य ठेवण्याच्या दृष्टिने रस्त्यावरील खड्डे दुरुस्तीचे काम दि.२१.०१.२०२० पासून हाती घेवून सदयस्थितीत पूर्ण झाले आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

तसेच मेडशी ब्राम्हणवाडा डव्हा इ.जी.मा.१५ दर्जाचा रस्ता असून सदर रस्त्याच्या १३.८० कि.मी.लांबीपैकी डव्हा फाटा ते डव्हा या २.३० कि.मी.लांबीचा समावेश शासनाचा महत्वकांक्षी प्रकल्प हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत पालखी मार्ग म्हणून समाविष्ट आहे.या रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग ७.०० मी.रुंदीचा असून सदयस्थितीत वाहतुकीयोग्य आहे व या रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महापरिक्षा पोर्टलमध्ये त्रूटी असल्याबाबत

**(३८) * ८५२ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सरकारी नोकर भरतीत पारदर्शकता यावी व सर्व प्रक्रिया ऑनलाईन व्हावी म्हणून शासनाच्या विविध विभागातील रिक्त असलेल्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या जागा भरण्यासाठी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान महाआयटीतर्फे संगणकीय प्रक्रियेचे महापरिक्षा-पोर्टल शासनामार्फत सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महापरिक्षा पोर्टल अंतर्गत कोल्हापूर जिल्हयामध्ये तलाठी पद भरतीमध्ये पात्र विद्यार्थ्यांना निवड प्रक्रिया करताना डावलण्यात आले असल्याबाबतची लेखी तक्रार परिक्षार्थीनी व मा.लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मा.महसूल मंत्री यांचेकडे दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महापरिक्षा पोर्टलमध्ये अनेक प्रकारच्या त्रूटी असून परिक्षार्थी उमेदवारांच्या भरतीअंतर्गत परिक्षेचा गोंधळ, चुकीची प्रश्नपत्रिका, सदोष निकाल, उत्तरपत्रिकातील त्रुटी, अनुपस्थित उमेदवारांची अंतिम यादीत नावे अशा अनेक प्रकारच्या त्रूटी असल्याने ते तातडीने बंद करण्यात यावे अशा विविध स्तरातून अनेक तक्रारी आलेल्या असून लोकप्रतिनिधींमार्फतही शासनाकडे अशा प्रकारच्या मागण्या करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, “त्रयस्थ संस्थेमार्फत पोर्टलचे तांत्रिक परिक्षण करुन त्यांचेकडून प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे आवश्यक ते बदल करण्यात येतील” असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पोर्टलमध्ये कोणकोणत्या त्रूटी असल्याचे निदर्शनास आले आहे व सदर महापोर्टलबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) होय.

(२) निवेदन विभागास प्राप्त झालेले नाही.

(३) व (४) होय.

(५) याबाबत प्राप्त सूचना व तक्रारीचे विश्लेषण करुन सिस्टीममध्ये योग्य ते सर्व समावेशक बदल करण्यात येतील. तसेच महा-ई परीक्षा पोर्टलचे तांत्रिक परिक्षण (ऑडीट) हे त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेला जलसंपदा विभागाने दंड आकारल्याबाबत

**(३९) * १०९७ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेने माहे जुलै ते जून, २०१७-१८ या कालावधीत १८.७८ टीएमसी व माहे जुलै ते जून, २०१८-१९ मध्ये १७.१७ टीएमसी पाणी वापरल्याने जलसंपदा विभागाने या दोन्ही वर्षांचा मिळून रु.१४ कोटी ९६ लाख ११ हजार ३४४ दंड महानगरपालिकेवर आकारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंपदा विभाग आणि पुणे महानगरपालिके दरम्यानची पाणी कराराची मुदत संपल्यानंतर जलसंपदा विभागाने वेळोवेळी विचारणा केल्यानंतरही महानगरपालिकेने वेळेत नव्याने करार न केल्याने महानगरपालिकेला दंड भरावा लागला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणातील विलंबाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) व (२) • पुणे महानगरपालिकेस जलसंपदा विभागाकडून सन २०१३ ते सन २०१९ या कालावधीत एकूण ११.५ टी.एम.सी. पाणी कोटा मंजूर आहे.
• तथापि, वाढत्या लोकसंख्येमुळे जुलै ते जून, २०१७-१८ या कालावधीत ६.९५ टी.एम.सी. व जुलै ते जून २०१८-१९ या कालावधीत ५.५२ टी.एम.सी. एवढा पाण्याचा जास्त वापर झाला असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• मंजूर कोटयापेक्षा पाण्याचा ज्यादा वापर झालेला असल्यामुळे जलसंपदा विभागाने पुणे महानगरपालिकेस रु.१५.१९ कोटी एवढी अतिरिक्त रक्कम आकारली होती. तथापि, पुणे महानगरपालिकेने तपासणी करुन रु.१३.३८ कोटी एवढी रक्कम जलसंपदा विभागास अदा केलेली आहे.

• पुणे महानगरपालिका व जलसंपदा विभाग यांच्यामध्ये पाणी वापराचा करार झालेला असून त्याची मुदत दि.२८.२.२०१९ पर्यंत होती व त्यास दि.३१.८.२०१९ पर्यंत मुदतवाढ मिळाली होती.

• सदर मुदत संपुष्टात आली असून नवीन करारनामा करण्याबाबत मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांनी मान्यता दिलेली आहे.

• त्या अनुषंगाने करारनामा करण्याबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिका व जलसंपदा विभाग, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे.

• जलसंपदा विभागाने पुणे महानगरपालिकेस करारनामा नसल्याने सप्टेंबर ते डिसेंबर, २०१९ या कालावधीसाठी रु.१४.६२ कोटी एवढी दंडात्मक रक्कम आकारली आहे. तथापि, सदर दंडनीय रक्कम मान्य नसल्याने या प्रकरणी जलसंपदा विभागाशी विचार विनिमय सुरु असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी संयुक्तिक तोडगा निघण्याच्या दृष्टिकोनातून पुणे महानगरपालिका व जलसंपदा विभाग यांची शासन स्तरावर एकत्रित बैठक आयोजित करण्याचे प्रयोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४०) * १९७८ श्री.रविशेठ पाटील (पेण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ मध्ये सुरु झालेले मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम या मार्गावरील १४ मोठ्या पुलांच्या कामांसह अपूर्णावस्थेत आहे, त्यामुळे या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढून दरवर्षी शेकडो लोकांना नाहक प्राण गमवावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावरील पेण-वडखळ दरम्यानचा प्रवास हा मोठमोठे खड्डे, वाहतूक कोंडी, वाहनांचा धूर, धूळ इत्यादीमुळे जीवघेणा होत असल्याने पर्यटक कोकणातील पर्यटनस्थळांकडे अनुत्सुक असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई गोवा महामार्गातील चौपदरीकरणाच्या कामात रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यामधील खारपाडा ते कोलाड दरम्यान तसेच वाशी नाका या भागात दिवसाकाठी २५ ते ३० हजार लोकांची या महामार्गावरून ये जा असतांना या ठिकाणी सब-वे व सर्व्हिस रोडचे काम केले नसल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अपघात होवून जीवितहानी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागोठणे व कोलाड पेण शहराच्या जवळपास महामार्गाच्या दुतर्फा गटाराची व्य़वस्था नसल्याने पावसाळ्यात पुरजन्य परिस्थिती निर्माण होवून नागरिकांना अनेक अडचणींना समोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्यासाठी किती मुदत देण्यात आली आहे, सदर काम पूर्ण होण्याची मुदत उलटून गेली असल्यास विलंब करणाऱ्या ठेकेदारांवर आणि विलंब होऊनही त्यांच्यावर कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत तसेच सदर महामार्गावर होणारे अपघात व नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी संबंधित ठिकाणी गटार व्यवस्था, सब-वे व सर्व्हिस रोडचे काम सत्वर होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील पनवेल ते इंदापूर या कि.मी.००/०० ते कि.मी.८४/०० लांबीच्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील असून सदर काम प्रगतीपथावर आहे व इंदापूर ते झाराप या कि.मी.८४/०० ते ४५०/१७० लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

तथापि सदर राष्ट्रीय महामार्गाच्या सुरु असलेल्या कामामुळे महामार्गावर अपघात होऊ नयेत यादृष्टिने करारनाम्यानुसार योग्य ती खबरदारी घेऊन काम करण्यात येत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणातर्फे महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या करारनाम्यानुसार पनवेल ते इंदापूर या टप्प्यात एकूण २७ ठिकाणी अंडर पासेस असून वाशी नाका व इतर जोडरस्त्यांवर जंक्शन विकास (Junction Development) करण्यात येत आहे. तथापि रायगड जिल्हयातील खारपाडा ते कोलाड दरम्यान तसेच वाशी नाका या ठिकाणी सब वे व सर्व्हिस रोड करणे ही कामे मूळ मंजूर करारनाम्याव्यतिरिक्त असल्याने सदयस्थितीत या भागातील रखडलेले मंजूर चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामे विशेष मंजुरीने करण्याचे प्रस्तावित आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(३) अंशत: खरे आहे,

प्रकल्पाच्या व्याप्तीप्रमाणे महामार्गाच्या दुतर्फा गटाराचे काम प्रगतिपथावर असून विशेषत: वस्तीच्या ठिकाणचे गटाराचे काम प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना कंत्राटदारास देण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणा अंतर्गत पनवेल ते इंदापूर या ८४.०० कि.मी. लांबीच्या चौपदरीकरणाच्या कामाची मुदत माहे जून २०१४ पर्यंत होती. तथापि सन २०१६ पर्यंत पर्यावरण व वन विभागाच्या परवानगी तसेच भूसंपादनातील काही अडचणी यामुळे प्रकल्पास विलंब होऊन प्रकल्प रखडला होता. तथापि सन २०१६ दरम्यान प्रलंबित परवानग्या मिळाल्यानंतर

तसेच भूसंपादनाच्या प्रक्रियेला वेग मिळाल्याने प्रकल्पाला पुनरूज्जिवित करण्यासाठी केंद्र शासनाकडून One time fund infusion Scheme अंतर्गत रु.५४० कोटींची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. त्यानुसार माहे एप्रिल,२०१७ पासून सदर प्रकल्पाचे काम पुन्हा सुरु करण्यात आले असून सद्यस्थितीत कामाची भौतिक प्रगती सुमारे ७९ टक्के झाली आहे. त्यानुसार एकूण ८४ कि.मी. लांबीपैकी ५१ कि.मी.चे डीबीएम लेवल पर्यंतचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे व उर्वरीत काम माहे जून, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

तसेच ८४/०० कि.मी. ते ४५०/१७० या लांबीतील चौपदरीकरणाच्या कामास भूसंपादनात झालेला विलंब तसेच जनतेच्या विविध अधिकच्या मागण्या, वन जमीन, कोकण रेल्वे ओलांडण्यासाठी लागणारी परवानगी इ. कारणांमुळे काहीसा विलंब झाला आहे. तथापि जून २०२० पर्यंत २५० कि.मी. व माहे मार्च, २०२१ पर्यंत उर्वरीत सर्व कामासह ३६६ कि.मी. काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रकल्पाच्या व्याप्तीप्रमाणे भुयारी मार्ग, महामार्गाच्या दुतर्फा गटार व्यवस्था व सर्व्हिस रोडचे काम कंत्राटदारामार्फत प्राधान्याने करुन घेण्यात येत असून मूळ मंजूर चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर मंजूर व्याप्तीव्यतिरीक्त आवश्यक असलेल्या भुयारी मार्गांचा प्रस्ताव विशेष मंजुरीने करण्यासाठी केंद्र शासन विचाराधीन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (पूर्व), कुरारगाव येथील शिवरंजन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या एसआरए प्रकल्पात मुळ झोपडीधारकांना डावलण्यात आल्याबाबत

**(४१) * ५२५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (पूर्व), कुरारगाव येथील शिवरंजन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या एसआरए प्रकल्पात २७ मुळ झोपडीधारक सभासदांना डावलून बाहेरील व्यक्तींना पुनर्वसनाचे गाळे बेकायदा विक्री करुन विकासकाने गैरव्यवहार केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शिवरंजन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या एसआरए प्रकल्पात बेघर होऊन अन्याय झालेल्या मुळ २७ झोपडीधारक सभासदांना घरे देऊन त्यांचे पुनर्वसन करणेबाबत तसेच ३३ कुटुंबधारक सदस्यांना थकित भाडे तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड :** (१) होय.

दि.२६.१२.२०१९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सदर संस्थेच्या मंजूर परिशिष्ट-२ मध्ये एकूण ८५ झोपडीधारक पात्र आहेत. सदर पात्र झोपडीधारकांपैकी ५० झोपडीधारकांना दि.१८.१२.२०१० रोजी व उर्वरित ३५ झोपडीधारकांना दि.२६.०६.२०१९ रोजी सदनिकांचे वाटप करण्यात आलेले आहे. दि.२५.०७.२०१९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने १० अनधिकृत व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(ई)/३३ अन्वये कारवाई करुन सदर सदनिका ताब्यात घेण्याबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड-१ यांच्याकडे पाठविला आहे. ३३ झोपडीधारकांना भाडे मिळाले नसल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयात संस्थेचे विकासक व तक्रारदार यांची एकत्रित सुनावणी घेऊन दि.२२.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये विक्री घटकाचे बांधकाम थांबविण्याबाबत कळविले होते व त्यानुसार Stop work नोटीस पाठविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) विभागातील रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याबाबत

**(४२) * २६५९ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) विभागातील ११८३ कोटी रुपये निधीची रस्त्याची कामे मुंबई येथील ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीला दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मिळाली असून दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजीपर्यंत सदर कामे पुर्ण करण्याचे आदेश असून गत दहा महिन्यात या कंपनीने ग्रेड-१, ग्रेड-२ ची कामेही पुर्ण केलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुसद विभागातील माळेगाव ते खडका रस्ता, पुसद ते दिग्रस रस्ता, शेंबाळपिंपरी ते पुसद रस्ता, पुसद ते खडका रस्त्यांची कामे अतिशय निकृष्ट दर्जाची करण्यात येत असून सदर कंपनी मुख्य अभियंता व अधिक्षक अभियंता यांना जुमानत नसून आपल्या मर्जी प्रमाणे काम करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांडवा-मांडवा डांबरी रस्त्यावरील खड्डे मुरुमाने भरणे, जेथे मुरुम उपलब्ध असेल तेथेच काम करणे, काळी जमिनीवर मुरुम उपलब्ध नसल्यास तेथे ब्लँकेटींग न करणे, पुसद-दिग्रस मार्गावरील धुंदी घाटात रस्त्याच्या कडेला मुरुम उपलब्ध नसल्याने ब्लँकेटींग न केल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीने बऱ्याच ठिकाणी दोन्ही बाजूंचे रस्ते खोदून ठेवल्याने वाहतूकीस अडथळा निर्माण झाला असल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) खरे नाही.

(४) कामाच्या प्रगतीनुसार एकुण ३०६.५० लांबीपैकी ९.०० कि.मी. लांबीमध्ये ७.९० कि.मी. भागात दोन्ही बाजुने खोदकाम केले आहे. तथापि वाहतुक सुरक्षेकरीता आवश्यक त्या उपाययोजना वेळोवेळी करण्यात येत आहेत.
(५) व (६) Mile Stone नुसार कामाचे प्रगती साध्य न झाल्याने त्यांचेवर करारनाम्यानुसार प्रतिदिन रु. ५,७६,५००/- दराने दिनांक २२.१२.२०१९ पासून नुकसान भरपाई आकारण्यात आलेली आहे. तसेच कामाची आवश्यक प्रगती साध्य न झाल्यास करारनाम्यातील कलम ४.५ व ३१ अन्वये निविदा का रद्द करण्यात येऊ नये याबाबत उद्योजकास नोटीस देण्यात आलेली आहे.

-----------------

## चांदिवली (मुंबई उपनगर) साकीनाका खैराणी रोड येथील पुलाच्या बांधकामाबाबत

**(४३) * ८६८ श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदिवली (मुंबई उपनगर) साकीनाका खैराणी रोड येथील ४५ वर्ष जुना अत्यंत धोकादायक अवस्थेत असलेला पुल दिनांक २१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास महानगरपालिकेने तोडला असून सदर तोडलेल्या पुलाचे बांधकाम अदयाप पूर्ण झाले नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याच विभागातील सत्य नगरातील पादचारी पुलही कोसळला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पुलाची पुनर्बांधणी तातडीने करणेबाबत स्थानिक मा.लोकप्रतिनिधींनी मुंबई महानगरपालिकेतील संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त दोन्हीही पुलांची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तसेच नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या दोन्ही पुलांच्या पुनर्बांधणीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) चांदिवली साकीनाका खैराणी रोड येथील पुलाच्या पुनर्बांधणीकरिता सुरक्षिततेचा उपाय म्हणून माहे मार्च २०१९ मध्ये सदर पूल बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तोडण्यात आला हे खरे आहे.

तथापि पादचाऱ्यांसाठी त्याच जागेवर तात्पुरता पादचारी पूल महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आला आहे.

(२) सत्य नगर येथील पादचारी पुलाच्या एका बाजूचा पाया ढासळल्यामुळे पादचारी पूल खचला ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५) सदर दोन्ही पुलाच्या पुनर्बांधणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-

**<u>चांदिवली साकीनाका खैराणी रोड येथील पुल</u>**

• सदर पुलाच्या पुनर्बांधणीसाठी निविदा प्रक्रिया माहे जून, २०१९ पूर्ण करण्यात आली असून, कामाचे कार्यादेश माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये देण्यात आले.

• माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली असून, माहे मे, २०२० पर्यंत अर्धा पूल बांधून वापरात आणण्याचे नियोजित आहे.

• सदर पुलाचे बांधकाम माहे जानेवारी, २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**<u>सत्य नगर</u>**

• सदर पुलाची स्थळपाहणी करण्यात आली असून, तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती माहे जानेवारी, २०२० मध्ये करण्यात आली आहे.

-----------------

## अमरावती जिल्हयात हायब्रीड अन्युईटी तत्वावर दहा मार्गाचे रुंदीकरण करण्याकरीता आवश्यक निधी देण्याबाबत

**(४४) * २५९१ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात मागील अनेक वर्षापासून हायब्रीड अन्युईटी तत्वावर दहा मार्गाचे रुंदीकरण करण्यात येत आहे मात्र या कामांसाठी शासनाने आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन दिला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दहा मार्गाच्या कामासाठी निविदा रक्कम रुपये १४६० कोटीची असतांना फक्त रुपये २०० कोटीचा निधी देण्यात आलेला असुन दर्यापूर, अंजनगांव, मुर्तिजापूर इतर मार्गाची कामे संथ गतीने सुरु असल्याने या विभागातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमुख मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुक सुरू असल्याने नागरिक त्रस्त झाले असुन दुचाकी धारकांना जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांची होणारी अडचण लक्षात घेता सदर दहा मार्गाच्या रुंदीकरणाकरीता आवश्यक असलेला निधी उपल्बध करून सदरचे काम लवकर पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) अमरावती जिल्हयात हायब्रीड ॲन्युईटी तत्वावर AM-२ पॅकेज अंतर्गत ३५२.१५ किमी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करणे, या पॅकेजची किंमत रु.१४६० कोटी इतकी आहे. सद्यस्थितीत एकुण १२७.२५ किमी.लांबीचे काम पुर्ण झालेले आहे. उर्वरित काम प्रगतीत आहे. सदर पॅकेजचे दोन माईलस्टोन पुर्ण झालेले आहेत. शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुर्ण झालेल्या माईलस्टोन प्रमाणे या पॅकेज करिता शासन हिस्याची रक्कम रु.३७१.६७ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

-----------------

## कांदिवली (पूर्व) मागाठाणे येथील महिंद्रा कंपनीतून जाणाऱ्या प्रस्तावित असलेल्या डीपी रस्त्याबाबत

**(४५) * ६०२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (पूर्व) मतदार संघातील लोखंडवाला, क्रांतीनगर, हनुमान नगर, गोकुळ नगर, सिंग इस्टेट आणि ठाकूर व्हिलेज या परिसरात राहणाऱ्या लाखो लोकांची गैरसोय दूर करणारा मागाठाणे येथील महिंद्रा कंपनीतून जाणारा डीपी रस्ता प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावित डीपी रस्त्याचे काम पूर्ण होण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, या परिसरातील लाखो रहिवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका करणाऱ्या या प्रस्तावित डीपी रस्त्याचे काम किती कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रस्तावित ३६.६० मी. रुंद डीपी रस्ता हा मौजे आकुर्ली येथील महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनी, मौजे पोयसर येथील सिंग इस्टेट व समता नगर, म्हाडा अभिन्यासातून जातो.

सदर रस्त्याचे काम पूर्ण होण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

<u>**महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनी, आकुर्ली**</u>

• सदर अभिन्यासातील रस्त्याने बाधीत अंदाजे २४५ मीटर लांबीची जमीन विकास हस्तांतरण हक्कान्वये दिनांक १०.०८.२०१८ रोजी ताब्यात घेण्यात आली आहे.

• सदर रस्त्याच्या भागाचे काम करण्यासाठी दिनांक २७.०५.२०१९ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे.

• सदर रस्त्याचे काम दिनांक १६.०८.२०१९ पासून सुरु करण्यात आले असून, सदर रस्त्याच्या निविदेचा कार्यकाळ दिनांक २५.१२.२०२० पर्यंत आहे.

<u>**सिंग इस्टेट, मौजे पोयसर**</u>

• सदर अभिन्यासातील रस्त्याने बाधीत अंदाजे २५० मीटर लांबीच्या जमिनीचा आगाऊ ताबा अतिक्रमणासहित “जसा आहे त्या स्थितीत” विकास नियंत्रण व प्रोत्साहक नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार हस्तांतरणीय विकास हक्काच्या मोबदल्यात घेण्यात आला आहे.

• सदर रस्त्याने बाधीत असलेल्या ३४२ अतिक्रमित झोपडीधारकांपैकी पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन केल्यानंतर सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

**समता नगर, म्हाडा, मौजे पोयसर**

• सदर अभिन्यासातील ८५ मीटर लांब रस्त्याचे काम म्हाडा विकासकामार्फत करण्यात येणार असून, काम पूर्ण झाल्यानंतर सदर रस्ता म्हाडा प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

-----------------

## राहेरी बुद्रुक (जि.बुलढाणा) येथील इंग्रजकालीन पूल वाहतूकीकरिता धोकादायक झाल्याबाबत

**(४६) * १४०७ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहेरी बुद्रुक (जि.बुलढाणा) येथील इंग्रजकालीन पूलाला तडे गेले असून पूलावरील संरक्षित कठडे नादुरुस्त झाल्याने हा पूल वाहतूकीकरिता अत्यंत धोकादायक असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलावरून अद्याप जड वाहतूक सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा पुलाच्या दुरुस्तीकरिता शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे आहे.

राहेरी बुद्रुक (जि.बुलढाणा) येथील इंग्रजकालीन पूल राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ सी हया महामार्गावर येत असून सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितील आहे.

(२) होय.

(३) सदरील पूल हा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ सी हया महामार्गावर येत असून दि.०७.११.२०१९ रोजी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत पूलाच्या Superstructure ची दुरुस्ती/ बदलण्यासाठीचे अंदाजपत्रक वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरु असून मंजुरीनंतर निविदा प्रक्रिया पार पाडून तसेच वाहतूक अन्य मार्गाने वळवून पूलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्याबाबत नियोजन आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोकरदन (ता.भोकरदन, जि.जालना) शहरातून जालना शहराकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी जमीन संपादीत करण्यासाठी आलेला निधी विनावापर पडून असल्याबाबत

**(४७) * २१६७ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (ता.भोकरदन, जि.जालना) शहरातून जालना शहराकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी जमीन संपादीत करण्यासाठी गत ४ वर्षांपासून प्राप्त झालेला चार कोटी रुपयांचा निधी विनावापर पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोकरदन शहरातून जड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने अनेक वेळा शहरातील वाहतूक व्यवस्था ठप्प होऊन अपघातही होतात व त्यामुळे शहराबाहेरुन ३.५ कि.मी. वळण रस्ता करण्यात यावा अशी अनेक वर्षांची नागरिकांची मागणी तत्कालीन शासनाने मान्य करून सदरहू रस्त्यासाठी लागणाऱ्या १ हेक्टर भूसंपादनासाठी ४ कोटी रक्कम शासनामार्फत मंजूर करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपविभागीय अधिकारी (भोकरदन) यांनी सदर वळण रस्त्यासाठी लागणाऱ्या जमिनीची मोजणी करण्याची तसेच रस्ता बांधकाम करण्यासंदर्भात आवश्यक कामांची पूर्तता करण्याची मागणी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपअभियंता (सार्वजनिक बांधकाम, भोकरदन) यांनी सदर वळण रस्त्यासाठी जमिनीचे मार्किंग केले असुन खाजगी कन्सल्टन्सीकडून मोजणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम योग्यरित्या मार्गी लावण्यासाठी प्रशासकीय स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा प्रस्तावित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) सदरहू रस्त्याचे काम योग्यरित्या मार्गी लावण्याच्या दृष्टीने भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. याप्रकरणी भूसंपादनाचा निवाडा प्राप्त झाल्यानंतर रक्कम भूसंपादन अधिकाऱ्यांकडे वर्ग करता येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद ते नागपूर या राज्य महामार्गावरील सुलतानपूर ते अंजनी या मार्गावर खड्डे पडल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(४८) * १३५८ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद-नागपूर महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून नेहमी छोटे-मोठे अपघात होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद ते नागपूर या राज्य महामार्गावरील सुलतानपूर ते अंजनी या मार्गावर अनेक खड्डे पडले असून दिनांक २ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास एका दुचाकीच्या अपघातात दोन व्यक्ती गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मार्गावरील खड्ड्यांमुळे दररोज छोटे-मोठे अपघातात होतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या मार्गावरील खड्डे तातडीने बुजविण्याबाबत तसेच रस्त्यांची दुरूस्ती करण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांकडे स्थानिकांनी वारंवार मागणी करूनही त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) ते (५) औरंगाबाद ते नागपूर महामार्गातील सुमारे २८५ कि.मी.लांबी केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येत असून सुमारे ८०.८८ कि.मी.लांबी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे येते.

यापैकी केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील सुलतानपूर ते अंजनी रस्त्याचा भाग राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ सी अंतर्गत येत आहे. सदर रस्त्यावर खड्डे पडल्याची बाब निदर्शनास येताच त्याकरिता निविदा नियुक्त करुन दि.२३.०१.२०२० पासून खड्डे दुरुस्तीचे काम हाती घेवून सदयस्थितीत पूर्ण झाले आहे , असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील वज्रेश्वरी, अकलोली व गणेशपुरी येथील एमएमआरडीए मार्फत करण्यात येत असलेल्या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(४९) * २३१ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील वज्रेश्वरी, अकलोली व गणेशपुरी येथील एमएमआरडीए मार्फत करण्यात येत असलेला सुमारे १४ कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम

निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक नागरिकांनी निवेदन देऊन मा.आयुक्त, एमएमआरडीए यांच्याकडे कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम शिवसाई कंपनीने घेतली असता पोट ठेक्याने बेकायदेशीरपणे ध्रुव कंन्सल्टंट यांची नेमणूक करण्यात आल्याबाबत संबंधित जबाबदार अधिकारी यांच्यावर व ठेकेदारावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर नमूद केलेले पत्र मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२), (३) व (४) ठाणे जिल्हयातील वज्रेश्वरी-अकलोली व गणेशपूरी या रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे काम मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. सदर रस्त्याची लांबी ६.७३ कि.मी. व रुंदी ७.५० मीटर (दोन पदरी) असून सदर काम मे. शिवसाई कन्स्ट्रक्शन या कंपनीस रितसर ई-निविदा मागवून देण्यात आले आहे. सदर कामाचा कार्यादेश दिनांक ०४ डिसेंबर, २०१८ रोजी देण्यात आले असून कामाचा कालावधी १२ महिन्यांचा आहे. सदर कामाच्या दैनंदिन देखरेखीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी मे.ध्रुव कंन्सलटंन्सी सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीची अधिकृतरित्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) म्हणून रितसर नियुक्ती करण्यात आली आहे.

-----------------

## पुणे येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतीराव फुले यांनी सुरु केलेली भिडेवाडा शाळा मोडकळीस आल्याबाबत

**(५०) * ६६२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले),**

**श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतीराव फुले यांनी भिडेवाडा, पुणे येथे सन १९४८ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरु केली होती ती शाळा मोडकळीस आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १७२ वर्षे पुर्ण झालेल्या मुलींची पहिली शाळा असलेल्या भिडे वाड्याचे राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी मागणी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान भिडेवाडा बचाव कृती समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिडेवाडा शाळा दुरुस्तीसाठी महानगरपालिकेने सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात एक कोटीची तरतूद करुनही अद्याप याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दगडूशेठ गणपती मंदिराच्या समोर असणाऱ्या या वाड्याचे ऐतिहासिक स्मारक करण्यासाठी तसेच सदर शाळेची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) • सदर ऐतिहासिक वास्तू पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन त्या ठिकाणी राष्ट्रीय स्मारक करण्याबाबत पुणे महानगरपालिकेने मुख्य सभा ठराव दिनांक २१.०२.२००६ रोजी मान्य केला आहे.

• भिडेवाडा दुरुस्तीसाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाज पत्रकात दरवर्षी तरतुद करण्यात येत असून सन २०१९-२०२० च्या अंदाज पत्रकात रु.१,४०,००,०००/- ऐवढी रक्कमेची तरतुद केलेली आहे.

• सदर मिळकतीच्या जागेबाबत न्याय प्रविष्ठ प्रकरण सुरु असल्याने सदर जागा अद्याप पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली नसल्याने कोणत्याही प्रकारचे दुरुस्तीचे काम अद्याप पर्यंत करण्यात आलेले नाही.

• भिडेवाडा इमारतीस राष्ट्रीय स्मारक घोषित करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने हेरिटेज वास्तुंची ग्रेड यादी तयार केली असून त्यामध्ये भिडेवाड्याचा समावेश आहे.

• भिडेवाड्यास राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईतील १४ हजार उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(५१) * १७१५ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील १४ हजार उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास रखडल्याने इमारतीत राहणारी सुमारे ५० हजारहून अधिक कुटूंबे धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतीत रहात असल्याने त्यांच्या जिवितालाही धोका निर्माण झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही ना काही कारणास्तव ४६ प्रकरणांची परवानगी म्हाडाने रद्द केली, तर यामध्ये ११ इमारतीमध्ये राहणाऱ्या २०६४ भाडेकरुंचा समावेश असून, पुनर्विकास न झालेल्या इमारतींमध्ये ५१ हजार ३२१ कुटूंबे राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दक्षिण मुंबईतील १० पैकी ९ प्रकल्प विकासकांच्या अवाक्याबाहेर गेले असून तेथील जागांच्या किंमती मागील २५ वर्षात प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे प्रकल्पांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे अवघड झाल्याने पुनर्विकास रखडून अनेक इमारती धोकादायक स्थितीत गेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुर्नविकास म्हाडाने ३३ (७) अधिनियमान्वये करण्याबाबतची किती प्रकरणे सद्यःस्थितीत प्रलंबित आहेत,

(६) असल्यास, सुमारे ८ ते १० वर्षाचा कालावधी होऊनही इमारतींच्या पुनर्विकासाचे काम पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, पुर्नविकासाची कामे मुदतीत पूर्ण न करणाऱ्या विकासकांवर कोणती कारवाई करण्याचा निर्णय म्हाडाने वा शासनाने घेतला आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड :** (१) मुंबई शहर बेटावर एकुण १४२०७ उपकरप्राप्त इमारती असून मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सद्य:स्थितीत अंदाजे ३१ इतकी पुनर्विकासाची प्रकरणे (अंदाजे ३१ इमारती) प्रलंबित आहेत.

(२) होय, हे अंशतः खरे आहे. जुन्या उपकरप्राप्त इमारतींपैकी बहुतांश इमारतींची आयुमर्यादा संपुष्टात आली असून त्यापैकी काही इमारती दुरुस्ती पलिकडे गेल्या आहेत. या इमारतींच्या देखभालीकडे मालक/रहिवाशांनी दुर्लक्ष केल्यामुळे या इमारती संरचनात्मक दृष्ट्या क्षीण झालेल्या आहेत. या इमारतींकरिता म्हाड अधिनियमातील तरतुदीनुसार, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत धोकादायक आढळलेल्या इमारतींची निधीच्या उपलब्धतेनुसार वेळोवेळी संरचनात्मक दुरुस्ती करण्यात येते.

(३) होय, हे खरे आहे. खाजगी मालक / विकासकांना ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतर, पुनर्विकासाचे कामे सुरु केली नसल्याने, भाडेकरु / रहिवाशी यांनी ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करुन, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. भाडेकरु /

रहिवाशी यांनी केलेल्या विनंतीनुसार,  ना-हरकत प्रमाणपत्र रद्द केले आहेत व धोकादायक आढळलेल्या इमारतींची निधीच्या उपलब्धतेनुसार संरचनात्मक दुरुस्ती केली आहे.

(४) होय, हे खरे आहे. सद्य:स्थितीत बांधकाम क्षेत्रातील आर्थिक मंदीमुळे पुनर्विकासाची गती मंदावली आहे.

(५) सद्य:स्थितीत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे अंदाजे ३१ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(६) होय, हे अंशतः खरे आहे.

(७) मुंबई शहरातील जीर्ण व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या जलद पुनर्विकासासाठी शासनाने दि.११.९.२०१९ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच, ज्या खाजगी मालक / विकासकांनी पुनर्विकास प्रकल्प अर्धवट अवस्थेत सोडले आहेत, त्यांच्या मालमत्ता भुसंपादित करुन, प्रकल्प पुर्ण करण्याबाबत म्हाड अधिनियमात सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारत पुनर्विकास योजनेतील ४४ खासगी विकासकांकडे १६७ कोटी रुपयांची थकबाकी असल्याबाबत

**(५२) * १४५० डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील, म्हाडाच्या पुनर्विकास योजनांमध्ये सहभागी असलेल्या, खाजगी ४४ विकासकांनी म्हाडाची संक्रमण शिबीरातील ३,३५३ घरे अद्याप स्वत:च्या ताब्यात ठेऊन, म्हाडाचे भाडयापोटी सुमारे १६६ कोटी ९२ लाख रुपये थकित ठेवल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त थकबाकी वसूल करण्याच्या अनुषंगाने म्हाडाने कोणती कार्यवाही सुरु केली आहे व आतापर्यंत किती थकबाकी वसूल केली आहे तसेच विकासकांच्या ताब्यात ३३५३ घरे असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, माहे फेब्रुवारी, २०२० अखेरपर्यंत ४४ विकासकांपैकी किती विकासकांनी थकित भाडे रक्कम म्हाडास अदा केली आहे व उर्वरित विकासकांकडून थकित रक्कम मिळू शकत नसल्यास, त्यांनी बांधकाम केलेल्या प्रकल्पातील घरे जप्त करुन ताब्यात घेणेबाबत, अद्याप कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे

(२) • विकासकामार्फत भाडे अदा करण्याबाबत दिरंगाई व अनियमितता दिसून आल्याने थकीत रक्कमेचा भरणा करणेबाबत तसेच थकीत रक्कमेचा भरणा न केल्यास म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ९५अ(३) नुसार सक्तीची निष्कासन कारवाई करुन संक्रमण गाळे ताब्यात घेण्यात येतील, अशा आशयाच्या नोटीस विकासकास म्हाडाद्वारे देण्यात आल्या आहेत.

• सदर नोटीसला विकासकामार्फत कुठलाही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने विकासक करित असलेल्या पुनर्विकास प्रकल्पास काम थांबवा नोटीस (Stop Work Notice) म्हाडाद्वारे देण्यात आल्या आहेत.

• म्हाड अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कारवाई करणेस्तव विकासक यांचे बँक खात्यांचा तपशिल व जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन विकासक यांचे जंगम व स्थावर मालमत्तेचा तपशिल मागविण्यात आला आहे. तथापी सदर अहवाल अद्याप म्हाडास अप्राप्त असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई म्हाडाकडून करण्यात येईल.

• विकासकांकडील संक्रमण गाळ्यापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरिता मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधीत पॅनल वकील यांना म्हाडाकडून कळविण्यात आले आहे.

• थकबाकीदार १२ विकासकांविरुध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे म्हाडाकडून तक्रार दाखल करण्यात आली आहे.

• विकासक करित असलेला पुनर्विकास प्रकल्प अद्याप पर्यंत अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे विकासकांना वितरीत केलेले संक्रमण गाळे अद्यापही विकासक यांचे ताब्यात आहेत.

• विकासकांना काम थांबवा नोटीस दिल्यानंतर माहे एप्रिल २०१६ ते माहे मार्च २०१९ पर्यंत रक्कम रु.८५.११ कोटी व चालू वर्षामध्ये माहे एप्रिल २०१९ ते ३१ जानेवारी २०२० दरम्यान रु.१८.०३ कोटी रक्कम अशी एकूण रु.१०३.१४ कोटी वसुल करण्यात आली आहे.

(३)• विकासकांना काम थांबवा नोटीस दिल्यानंतर माहे ०१ एप्रिल २०१६ ते माहे ३१ जानेवारी २०२० या कालावधी दरम्यान एकूण २७ विकासक यांनी एकूण रु.१०३.१४ कोटी थकीत भाडे रक्कमेचा भरणा केलेला आहे.

• मंडळामार्फत वि.नि.नि. ३३(५), ३३(७) अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या विकासकांना वितरीत केलेल्या संक्रमण गाळ्यापोटी थकीत रक्कमेचा भरणा केल्याबाबतचे ना देय ना हरकत प्रमाणपत्राशिवाय पुढील कोणत्याही परवानग्या न देण्याबाबत संबंधीत विभाग यांना कळविण्यात आलेले आहे.

• एस.आर.ए. अंतर्गत वि.नि.नि.३३(१०) अंतर्गत एकुण ०६ विकासक हे पुनर्विकास करीत असलेल्या प्रकल्पास काम थांबवा नोटीस देण्याबाबत व १२ विकासक यांना संक्रमण गाळयांपोटी थकीत भाडे भरणा करीत नाहीत तोपर्यंत सदर विकासक यांना इतर परवानग्या देण्यात येऊ नये, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अरबी समुद्रात उभारण्यात येणा-या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५३) * १५९८ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अरबी समुद्रात उभारण्यात येणा-या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामासाठी सन २०१७ मध्ये काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत व दिलेल्या कंत्राटात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाच्या कामाच्या निविदा सन २०१७ मध्ये काढण्यात आल्या असून त्यामध्ये एल अँड टी कंपनीची रूपये ३ हजार ८२६ कोटी रक्कमेची निविदा प्राप्त झाली होती, सदर कंपनीच्या निविदेनुसार अन्य कामांसह ८३.२ मीटर उंचीचा पुतळा आणि ३८ मीटर लांबीची तलवार या बाबी अंतर्भूत होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन शासनाने एल अँड टी कंपनीशी वाटाघाटी करुन कंत्राटाची रक्कम ३ हजार ८२६ कोटींवरुन रुपये २ हजार ५०० कोटी पर्यंत कमी केल्याचे दाखवून स्मारकाचे मूळ संरचनेत बदल करुन स्मारकाची उंची १२१.२ मी. कायम ठेवली असे दाखवून पुतळ्याची उंची ७५.७ मीटर व तलवारीची लांबी ४५.५ मीटर वाढविण्यात येवून स्मारकाचे क्षेत्र १५.६ हेक्टरवरुन १२.८ हेक्टरपर्यंत कमी करण्यात आल्यामुळे त्यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी यावर्षी संसदेस सादर केलेल्या अहवालामध्ये "हा व्यवहार कंत्राटदार कंपनीच्या फायद्यासाठी पुर्ननिविदा न मागविता केला असल्याचा" लेखी आक्षेप देखील नोंदविला असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोक चव्हाण :** (१) हे खरे नाही.

या प्रकल्पाचे महालेखाकारांकडून नियमीत लेखापरिक्षण झाले असून महालेखाकारांनी त्यांच्या पत्रान्वये काही मुद्यांबाबत नियमीत कार्यपध्दतीनुसार निरीक्षणे नोंदविली आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

उच्चस्तरीय सुकाणू समितीने निविदा अटी व शर्ती यांच्या मर्यादेत व स्मारकाच्या एकूण २१० मीटर उंचीमध्ये बदल न करता प्रकल्पाची किंमत कमी करण्याच्या दृष्टीने मे. एल अँड टी कंपनीसोबत वाटाघाटी करण्याच्या दिलेल्या निर्देशास अनुसरुन प्रकल्पाचे Cost Optimisation करण्यात आले. त्यानुसार उलट संपूर्ण स्मारकाची एकूण उंची २१२ मीटर अंतिम करण्यात आली असून भरावाचे किमान क्षेत्रफळ ६.८० हेक्टर ठेवण्यात आले आहे. Cost Optimisation अंती कंत्राटाची किंमत रु.२५८१ कोटी + वस्तू व सेवा कर अशी निश्चित करण्यात आली आहे. निविदा प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.

(४) व (५) छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प विभागाचे नियमित लेखापरिक्षण महालेखाकार कार्यालयाकडून मे-जून २०१९ मध्ये करण्यात आलेले असून सदर लेखापरिक्षणात सल्लागारांच्या सेवांबाबत व कंत्राटदारांच्या नेमणूकीबाबत मुद्दे/आक्षेप उपस्थित केले असून त्यांचे अनुपालन मंडळ

कार्यालयामार्फत महालेखाकारांना दिनांक ५.१२.२०१९ रोजी सादर करण्यात आले आहे. लेखापरिक्षणातील मुद्यांबाबत उचित निर्णय घेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार प्रकल्पाचे काम पुढे सुरु करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार नगरपरिषदेने नियमांचे उल्लंघन करून निवीदा न मागविता मे. जयसाई कन्स्ट्रक्शन कंपनीस दिलेल्या कामाबाबत

**(५४) * १५०२ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी नियमांचे उल्लंघन करून निवीदा न मागविता मे. जयसाई कन्स्ट्रक्शन कंपनीस देण्यात आलेल्या कामांमध्ये गैरव्यवहार केला असल्याची तक्रार माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे. जयसाई कन्स्ट्रक्शन कंपनी नोंदणीकृत नसून या कंपनीला देण्यात आलेल्या सदर कामांच्या कार्यारंभ आदेशामध्ये रस्त्याची लांबी, रूंदी व आवश्यक माहिती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, त्याचा तपशील काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) मे. जयसाई कन्स्ट्रक्शन हे वर्ग-४, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कंत्राटदार असून, सदर कंपनीची नोंदणी दि.०२.१२.२०२१ पर्यंत ग्राह्य आहे.

सदर कंपनीस माहे जुलै, २०१९ ते सप्टेंबर, २०१९ या कालावधीत विविध कामाचे आदेश देण्यात आले असून, सर्व आदेश ई-निविदा प्रक्रिया राबवून देण्यात आले आहेत.

सदर कंपनीस देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशात रस्त्यांची लांबी व रुंदी नमूद नसून, सदर बाबींचा समावेश अंदाजपत्रकात नमूद असल्याबाबत जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळील (मुंबई) हिमालय पूल उभारण्याबाबत

**(५५) * १३ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळील (मुंबई) हिमालय पूल माहे मार्च, २०१९ मध्ये पडून या दुघटनेत ७ प्रवासी ठार व २० हून अधिक जण जखमी झाले होते, तदनंतर आजमितीस जवळजवळ १० महिन्यांचा कालावधी उलटला असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पूल उभारण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुल उभारण्यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूल उभारण्याच्या उदासिनतेमुळे प्रवाशांना तसेच पादचाऱ्यांना नाहक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पूल उभारणी कामास अद्याप सुरुवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर पुलाच्या उभारणीचे काम विनाविलंब हाती घेऊन लवकरात लवकर पूल कार्यान्वित होण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) हिमालय पुलापासून २०० मीटर अंतरावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळ सब-वे ची व्यवस्था असल्याने सदर ठिकाणी पुन:श्च पूल उभारण्याबाबत त्वरीत निर्णय घेण्यात आला नव्हता.

तथापि, माहे मार्च, २०१९ मध्ये छत्रपती शिवाजी टर्मिनसजवळील हिमालय पूल दुर्घटनेनंतर पादचाऱ्यांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत सिग्नल यंत्रणेसह झेब्रा क्रॉसिंगची व्यवस्था तात्काळ करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वाहतुक व समन्वय विभागाने दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ रोजी अभिप्राय दिल्यानंतर सदर ठिकाणी पूल उभारण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

- नियुक्त सल्लागारांमार्फत सदर पादचारी पुलाचे आराखडे बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- सदर पूल हा पुरातन वास्तु क्षेत्रात येत असल्यामुळे सदर आराखडयास पुरातत्व समितीची ना-हरकत घेतल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

तदनंतर ठेकेदाराची नेमणुक करुन पुलाचे काम प्राधान्याने करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या अवलंबितांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत

**(५६) * २७८७ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वातंत्र्य संग्राम अवलंबितांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्याबाबत लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) होय.

(२) व (३) निवेदनामध्ये नमुद स्वातंत्र्य सैनिक अवलंबितांच्या मागणयांबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## बेळगाव-गोवा या आंतरराज्य मार्गावरील धामणी नदीवरील बंधारा वाहतूकीस धोकादायक असल्याबाबत

**(५७) * ३४९७ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रस्तावित बेळगाव-गोवा या आंतरराज्य मार्गावरील म्हासुर्ली-चौधरीवाडी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) ते चौधरीवाडी (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) येथील धामणी नदीवरील बंधारा वाहतूकीस धोकादायक बनला असल्यामुळे पंचक्रोशीतील ग्रामस्थांची फार मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्यावरुन कोकण व गगनबावडा येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असुन सदरील अर्धा कि.मी. अंतराची नोंद सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नसल्याने पुलाचे काम मागील अनेक वर्षे रखडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी मोठा पुल होण्यासाठी सार्व.बांधकाम विभागाने प्रस्तावीत केले आहे काय, त्याची सद्य:स्थिती काय आहे व याबाबत अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, अंशत खरे आहे.

प्रश्नांकित धामणी नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावरुन म्हासुर्लीकडून चौधरीवाडी मार्गे गगनबावडयाकडे वाहतूक चालते. सदर बंधाऱ्याची देखभाल दुरुस्ती जलसंपदा विभाग यांच्या अखत्यारीत येत असून कोल्हापूर पाटबंधारे मंडळ यांच्या अहवालानुसार सदर बंधारा सुस्थितीत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर बंधारा दोन तालुक्यांना (राधानगरी व गगनबावडा) जोडणारा रस्ता असल्याने त्यावर नेहमी वाहतुक सुरु असते. उपलब्ध निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार पुलाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ला (मुंबई) येथील अनधिकृत गाळे व गोदामांविरोधात कारवाई करण्याबाबत

**(५८) * १८८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.राहुल नार्वेकर**

**(कुलाबा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला पश्चिमेकडील खैरानी रोडवरील कारखान्यांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान भीषण आग लागून दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीमध्ये १५ ते २० गोदामे जळून खाक झाली आहेत तसेच यापूर्वी म्हणजेच दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास याच परिसरातील एका फरसाणाच्या कारखान्याला भिषण आग लागल्याची घटना घडली असून मुंबईमध्ये वर्षभरात सर्वाधिक म्हणजे एकूण ५४२७ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या तर मागील दहा वर्षात ४८ हजार ४३४ ठिकाणी आगी लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईमधील कुर्ला येथील खैरानी रोडवरील आगीच्या घटनेनंतर मुंबई महानगरपालिकेने कुर्ला येथील अनधिकृत गाळे, गोदामांविरोधात कारवाईस सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेने २८ गाळ्यांची/दुकानांची तपासणी केली असून या तपासणीत २८ पैकी २१ गाळे/गोदाम अनधिकृतपणे उभारण्यात आले असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानूसार सदरच्या अनधिकृत गाळे/गोदामांच्या मालकांना नोटीसा देवून त्यांच्याविरोधात महानगरपालिकेकडून कोणती कारवाई करण्यात आली तसेच सातत्याने आग लागण्याच्या घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबईतील असल्फा व्हिलेज, घाटकोपर (पश्चिम) येथील खैरानी रोडवरील २९ गाळ्यांना दिनांक २७.१२.२०१९ रोजी आग लागून दोन व्यक्तींचा मृत्यू झाला हे खरे आहे.

तसेच, दिनांक १८.१२.२०१७ रोजी खैरानी रोडवरील एका फरसाणाच्या कारखान्याला आग लागली होती.

सन २०१८-१९ या वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण ५४२७ आगीच्या घटना घडल्या असून, सन २००८ ते माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत एकूण ५६,१४५ आगीच्या घटना घडल्या आहेत.

(३) खैरानी रोडवरील आगीच्या घटनेनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत "एल" विभागातील २५० गाळ्यांची तपासणी करुन, सदर गाळ्यांना मुंबई महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार नोटीसा देऊन कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, दोषी व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेने तपासणीअंती १० गाळ्यांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत.

त्यानुसार कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या गाळेधारकांचे अनधिकृत गाळे निष्कासित करण्यात येणार असल्याचे व सदर परिसर निरीक्षणाखाली ठेवण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच, सदोष वीजेच्या जोडणी/तारांमुळे उद्भवणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी वीजपुरवठा करणाऱ्या संस्था/कंपनींना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ३० अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वागदर्डी धरणातून मनमाड शहराला पाणी पुरवठा करण्याच्या कामाबाबत

**(५९) * ४२५२ श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड शहरातील वागदर्डी धरणातून शहरातील सर्व आठही पाण्याच्या टाक्यांना इनटेलव्दारे फिल्टर प्लँटपासून पाईपलाईन टाकून जोडण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावित असलेल्या योजनेच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे काय व सदर काम पूर्ण होण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मनमाड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वागदर्डी फिल्टर हाऊस ते जय भवानी व्यायाम शाळेपर्यंत मुख्य जलवाहिनी टाकण्याच्या कामास शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता व निधी वितरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे.
(२) व (३) या कामाच्या अनुषंगाने निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही मनमाड नगरपरिषदेमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघातांचे वाढते प्रमाण रोखण्याबाबत

**(६०) * १५३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अपघाताची तीव्रता कमी होण्यासाठी व अपघात रोखण्यासाठी सुरक्षिततेचा उपाय म्हणून बसविण्यात आलेल्या

लोखंडी पट्टीचे कठडे तुटले असुन रस्त्याच्या मध्यभागी खड्डे, तुटलेले बायफ्रेनरोप यामुळे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर अपघातांचा धोका वाढला असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे प्रवाशांना धोकादायकरीत्या प्रवास करावा लागत असून टोल घेऊनसुद्धा दुरुस्तीकडे होत असलेले दुर्लक्ष तसेच द्रुतगती मार्गासाठी झालेल्या करारानुसार दुरुस्तीसाठी आवश्यक रक्कम संबंधित कंत्राटदाराने न दिल्यामुळे द्रुतगती मार्गाची दुरवस्था झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील अपघातग्रस्तांसाठी बांधण्यात येणा-या ट्रामा सेंटरचे कामही रखडले असून या मार्गावरील पोलिस ठाण्यातील वाहने कालबाहय झाल्याने पोलीसांना गस्त घालण्यासाठी तसेच अपघातस्थळी जाण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त द्रुतगती मार्गावर माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या दोन भीषण अपघातात वाहने संरक्षक लोखंडी पट्टीला धडकल्यामुळे ३ जणांचा जागीच मृत्यु होवून ६ जण गंभीररित्या जखमी झाले आहे, तसेच पुणे मुंबई महामार्गावर सुरक्षिततेच्या उपाययोजना अभावी सन २०१९ मध्ये ३५२ अपघाताच्या घटना घडल्या असून त्यात ९१ जणांना जीव गमवावा लागला व शेकडो नागरिक गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अपघातांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी येथील ट्रामा सेंटरचे काम लवकरात लवकर करणे व येथील पोलीसांना नवीन वाहने उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सुरक्षतेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष करणा-या संबंधीत विभागाच्या अधिका-यांवर व दुरुस्तीसाठी आवश्यक रक्कम न देणा-या संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबई- पुणे द्रुतगती मार्गाची वेळोवेळी आवश्यक दुरुस्ती करण्यात येत आहे. तसेच वाहतूक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तथापी प्रश्नात नमूद केलेप्रमाणे दोन अपघात झाले आहेत.

(४) या रस्त्यावर वाहतूक सुरक्षेच्या आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड, रत्नागिरी व सिंधदुर्ग जिल्ह्यातून जाणाऱ्या सागरी महामार्गाचे काम रखडल्याबाबत

**(६१) * १२४२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड, रत्नागिरी व सिंधदुर्ग जिल्ह्यातून जाणाऱ्या ५७० किलोमीटर लांबीच्या सागरी महामार्गाचे काम रखडले असून वर्षभरापूर्वी ड्रोन कॅमेऱ्याच्या माध्यमातून सर्वेक्षण होऊनही अद्याप त्याचा विकास आराखडाही तयार झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाचा विकास आराखडा जाणीवपूर्वक रखडविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच विकास आराखडा तयार करून या महामार्गाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात कैंव्हापासून होणार आहे व त्यानुसार सदर महामार्गाचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातून जाणाऱ्या सुमारे ५७० कि.मी. लांबीच्या सागरी महामार्गाचे पेव्हड शोल्डरसह उन्नतीकरण करण्याच्या कामाकरीता प्रत्यक्ष सर्वेक्षण व ड्रोन कॅमेरा वापरुन सर्वेक्षण करण्यात आले असून कामाचा प्रारुप आराखडा मार्च,२०१८ मध्ये केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

(३) केंद्र शासनाकडे सादर केलेल्या प्रारुप आराखड्याला मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे.

सदर रस्त्याच्या भूसंपादनाची प्राथमिक प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. तसेच प्रारुप आराखडयाच्या मंजुरीची कार्यवाही प्रगतीत असून मंजुरीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिका अंतर्गत सर्वे क्रमांक ९९२ ,९९३ व ९९४ या ठिकाणी रस्त्यासाठी भूसंपादन करताना झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(६२) * ३१ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत सिटी सेंटर मॉल ते गोविंद नगर रस्त्यासाठी केलेल्या भूसंपादनात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होऊन १ कोटी १६ लाख रुपये किंमतीच्या रस्त्यासाठी २७ कोटी रुपये दिल्याची तक्रार लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चैकशी करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय. अशा प्रकारचे निवेदन नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(२) सदर प्रकरणाबाबत वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

• नाशिक महानगरपालिकेमार्फत सिडको योजना क्र. १ ते योजना क्र.५ या भागांना जोडणाऱ्या १८ मिटर विकास योजना रस्त्याकरीता ८७०० चौ.मी. क्षेत्र संपादित करण्यासाठी प्रस्ताव महानगरपालिकेने जिल्हाधिकारी कार्यालयास भुसंपादन केस क्र.२७/०१ अन्वये सादर केला होता.

• संपादित करण्यात येणाऱ्या जमीनीमुळे बाह्यवळण रस्ता उपलब्ध होणार असल्याने व त्याची सिंहस्थ कुंभमेळा २००३ साठी तातडीने आवश्यकता असल्याने, खाजगी वाटाघाटीने जमीन संपादित करण्याचे नियोजन सन २००२-२००३ मध्ये करण्यात आले.

• महानगरपालिकेच्या आर्थिक तरतुदीनुसार जमीन मालक यांना जागा ताब्यात देण्याकरिता वाटाघाटीने रु.१,१५,०४,८६८/- इतकी रक्कम निश्चित करण्यात आली होती.

• जमीन मालकांना एकूण देय रकमेच्या ६२.५०% रक्कम अदा केल्यानंतर जमीन मालकांशी दि.२३/८/२००४ रोजी साठेखत करारनामा करण्यात आला. त्यानुसार खरेदीखत करण्याची अंतिम मुदत मार्च २००५ पर्यंत होती.

• खरेदीखत नोंदविण्यासाठी आवश्यक परवानग्यांची पुर्तता वेळेत न झाल्याने खरेदीखत नोंदविता आले नाही. त्यामुळे साठेखताची मुदत संपुष्टात आली. त्यामुळे वाटाघाटीव्दारे संपादनाची प्रक्रिया संपुष्टात आली.

• प्रस्तुत प्रकरणी भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदींच्या आधारे उपजिल्हाधिकारी, भूसंपादन यांनी दि.२४/३/२०१७ अन्वये निवाड्याची रक्कम रु.२७.८४ कोटी निश्चित केली.

• भूसंपादनाची कार्यवाही सन १९९९ मध्ये सुरु होऊन सन २०१७ मध्ये अंतिम झाली. परिणामी संपादनासाठी महानगरपालिकेस रु.२७.८४ कोटी इतकी रक्कम अदा करावी लागली.

• यावरुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने, या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करावी अशा सूचना आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील (जि.ठाणे) मोबाईल टॉवर कंपन्यांकडे महानगरपालिकेची मालमत्ता कराची थकबाकी असल्याबाबत

**(६३) * ९२७ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हददीतील (जि.ठाणे) मोबाईल टॉवर कंपन्यांकडे महानगरपालिकेची रुपये ११२ कोटी ८३ लाखांवर मालमत्तेची थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोबाईल टॉवर कंपन्यांकडे एवढया मोठया प्रमाणात मालमत्ता कराची थकबाकी असण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू थकबाकी वसूल करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ४७१ मोबाईल टॉवरच्या करापोटी दि. ०४.०२.२०२० पर्यंत एकूण रू.११३.७७ कोटी इतक्या रक्कमेची थकबाकी आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात एकूण ९ कंपन्यांचे मोबाईल टॉवर असून थकबाकीसह एकूण मागणी रू. ११८.१० कोटी इतकी आहे.

• त्यापैकी ४ कंपन्यांकडून सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रू.४.३३ कोटी इतका मूळ मालमत्ता कर वसुल केलेला आहे.

• ५ कंपन्यांनी मा. उच्च न्यायालयात महानगरपालिकेने लावलेल्या शास्ती व व्याजाच्या विरोधात याचिका दाखल केल्या असून मा. उच्च न्यायालयाने सर्व प्रकरणी स्थगिती आदेश दिल्याने मालमत्ता कर वसूलीची कारवाई करता आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

• मा.उच्च न्यायालयाने दिलेले स्थगिती आदेश उठविण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा ते वीट (जि.सोलापूर) या रस्त्याची झालेली दूरवस्था

**(६४) * ४०५०  श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा ते वीट (जि.सोलापूर) या रस्त्याची दूरवस्था झाली असून काही दिवसांपूर्वी ठेकेदाराने रस्त्याचे काम सुरु करून अचानकपणे बंद केले असल्याने अपूर्णावस्थेतील कामामुळे या रस्त्यावर अपघातांच्या घटना घडत आहेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही दिवसांपूर्वी दुचाकी व सायकल यांची धडक होऊन एक विद्यार्थी जखमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची परवानगी नसतानाही रस्त्याचे काम सुरु होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून जबाबदार असणाऱ्या ठेकेदार व संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही. दौंड, करमाळा, परांडा, उस्मानाबाद हा रस्ता राज्य मार्ग क्र.६८ असा आहे. तथापि मोठया प्रमाणात पाऊस झाल्यामुळे प्रश्नांकीत रस्त्यावरील पडलेले खड्डे बुजवून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही. करमाळा पोलीस ठाणे यांच्या अभिलेखातील नोंदीनुसार विषयांकित मार्गावर अशा प्रकारच्या अपघाताची नोंद आढळून येत नाही.
(३) आशियाई बँकेच्या अर्थसहाय्याने सोलापूर जिल्हयातील दौंड, करमाळा परंडा बार्शी उस्मानाबाद रा.मा.६८ साठी रस्ता सुधारणा कामास प्रशासकीय

मंजूरी प्राप्त असून निविदा प्रक्रिया पुर्ण झाली आहे. तथापि वन व पर्यावरण मंत्रालयाकडून Environmental Clearance अदयाप प्राप्त न झाल्याने प्रत्यक्ष काम सुरु केले नाही. तथापि काम सुरु करण्याची पूर्व तयारी करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर-निटर-औराद-शहाजनी मार्गाच्या संथ कामामुळे वाढलेले अपघाताचे प्रमाण

**(६५) * ७४९ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर-निलगा-भालकी- जहीराबाद हा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२ औरादहून जातो या मार्गाचे महाराष्ट्र हद्दीतील काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर-निटर-औराद-शहाजनी या ६४.९३६ कि.मी.चे काम वालेचा-एसडीपीएल या कंत्राटदाराला देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी रुपये ३१५ कोटी खर्च होणार असून हे काम २४ महिन्यात म्हणजे २६ नोव्हेंबर, २०१९ रोजीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु कंत्राटदाराच्या संथ गतीमुळे अद्यापही काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील वर्षी निलंगा ते औराद शहाजानी या २० कि.मी.रस्त्यांचे खोदकाम करुन कामाला सुरुवात करण्यात आली व हे करीत असताना सदर कंत्राटदाराने सर्वच २० कि.मी.चा रस्ता सलग खोदून ठेवला पण वाहतुकीसाठी पर्यायी रस्ता करण्याची तसदी मात्र घेतली नाही,फलकही लावले नाही त्यामुळे सदर रस्त्यावर अनेकदा अपघात होऊन त्यात अनेक लोकांनी जीव गमावले असून अनेक जण जखमी झाले आहेत, हे  ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर कामाच्या विलंबास तसेच निकृष्ट दर्जेबाबत जबाबदार असणा-या संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही, सदरचा रस्ता दोन पदरी आहे. एका लेन मध्ये काम सुरु करुन तेथील भरावाचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता वाहतुकीस योग्य करुन नंतरच दुसऱ्या लेन चे काम चालू केलेले आहे. तरी वाहतुकीस कोणताही अडथळा झालेला नाही. माहिती दर्शक फलक वाहतुकीच्या सोयी साठी लावण्यात आलेले आहेत.

(५) हे खरे नाही, स्थानिक लोकांच्या विरोधामुळे कामास विलंब झालेला आहे.

लोकांना समजवण्यामध्ये बराच वेळ वाया गेलेला आहे. बऱ्याचवेळी पोलिस बंदोबस्तामध्ये काम करावे लागले आहे. तसेच पुढील साखळी क्र. मधील भूसंपादनाच्या विलंबामुळे हि कामास विलंब झालेला आहे. ०/८५० ते १/१५०, ३/०३० ते ३/५००, २०/३०० ते २०/५४०, ३४/५०० ते ३४/७००, ४१/७५० ते ४२/३५०, ४५/७५० ते ४५/९५०, ४८/८५० ते ४९/१५०, ५७/२५० ते ५७/४५०, ५९/४०० ते ५९/७५०, ६२/८५० ते ६३/१०० रस्त्याचे बांधकाम सडक व परीवहन मंत्रालय नवी दिल्ली यांचे मानकानुसार प्रगतीपथावर आहे आणि वेळोवेळी नियमानुसार कामाची तपासणी चाचणी निष्कर्ष घेऊन गुणवत्ते विषयी खात्री करण्यात आलेली आहे. सदरचे चाचणी निष्कर्ष हे मानकाप्रमाणे आढळून आलेले आहेत. त्यामुळे अधिकारी, ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) अ) स्थानिक नागरिक, विविध संघटना, इत्यादींचा तीव्र विरोध

ब) रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडे तोडण्याची परवानगी

क) रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या विद्युत वाहिन्या, पाणी पुरवठा वाहिन्या इ. चे स्थलांतर.

-----------------

## मुंबई शहरातील माहूल प्रकल्पग्रस्तांनी हक्काची घरे मिळण्याबाबत केलेली मागणी

**(६६) * ६०७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर, उपनगरातील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन माहुलमध्ये करण्यात आले असून माहुल परिसरातील सेवा-सुविधांचा अभाव व वाढत्या प्रदुषणाने त्रस्त झालेल्या नागरिकांना पर्यायी जागा वा घरभाडे देण्याचा मा.उच्च न्यायालयाने निर्णय देऊनही अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहूल या स्थलांतरीत परिसरातील रासायनिक कंपन्याच्या प्रदुषणामुळे तेथील अनेक रहिवाशी क्षयरोग, कर्करोग,त्वचाविकार व दम्यासारख्या आजारांनी त्रस्त असून काही लोकांना जीव गमवावा लागला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहूलमधील रहिवाशांना दरमहा १५ हजार रुपये घरभाडे आणि घरांसाठी ४५ हजार रुपये अनामत रक्कम देण्याचे आदेश दिनांक ४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.उच्च न्यायालयाने देऊनही अद्याप माहुलवासीयांना घरभाडे मिळू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात दिनांक २ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास या माहूलवासियांनी पुनर्वसन करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई शहरातील माहूल प्रकल्पग्रस्तांनी हक्काची घरे मिळण्याबाबत व प्रशासनाने दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबत मागणी केली असल्याचेही माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २३.०९.२०१९ रोजीच्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायलयात बृहन्मुंबई महानगरपालिकेने विशेष अनुमती याचिका दाखल केली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तसेच, माहुल एव्हरस्माईल येथे सन २०१३ ते जानेवारी २०२० (आजतागायत) या कालावधीत एकूण ५१ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, सदर मृत्यू हे प्रदुषणामुळे झाले आहेत असे आढळून येत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

माहूल परिसरामध्ये पुनर्वसन करण्यात आलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन माहुल येथे करण्यात येत असून सदर ठिकाणी पुनर्वसित लोकांना पुढीलप्रमाणे सेवा उपलब्ध आहेतः-

• सदर संकुलांतर्गत असणाऱ्या मलनिःसारण वाहिन्यांचे जाळ्यांचे परिरक्षण केले जाते.

• सदर संकुलामध्ये २४ x ७ तत्वावर पाणी पुरवठा करण्यात येतो.

• सदर संकुलातील साफसफाईकरिता मुंबई स्वच्छ वस्ती प्रबोधन अभियानांतर्गत संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे.

• तसेच संकुलामध्ये कचरा उचलण्याकरीता दोन कचरा संकलन केंद्रे उभारण्यात आली आहेत.

• सदर संकुलामध्ये वेळोवेळी धुम्रफवारणी व मुषक नियंत्रण कारवाई करण्यात येते.

• संकुलनातील इमारतींची निकड-निहाय दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

• सामाईक विद्युत वापराचे देयक तसेच जल आकार महानगरपालिकेमार्फत भरण्यात येत आहे.

• संकुलातील अंतर्गत रस्त्यांचे परिरक्षण करण्यात येते.

• सदर संकुलाकरिता असणारे १०.०६ एमएलडी क्षमतेचे मलनिःसारण केंद्र महानगरपालिकेमार्फत चालविले तसेच परिरक्षित केले जातात

• सदर संकुलाशेजारी १६,०४८ चौ.मी. क्षेत्रफळाचे विकसित मनोरंजन मैदान नागरिकांच्या वापराकरीता उपलब्ध आहे.

• संकुलाशेजारील माहुल गावामध्ये बाजाराची सुविधा उपलब्ध आहे. तसेच सदर संकुलाशेजारील बाजाराकरीता आरक्षित भुखंडाच्या विकासाचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले आहे.

• सदर संकुलाकरिता महानगरपालिकेमार्फत मिनी अग्निशमन केंद्र उभारण्यात आले आहे.

• सदर संकुलांतर्गत समाजकल्याण केंद्रामध्ये महानगरपालिकेमार्फत इंग्रजी, हिंदी व मराठी माध्यमाची शाळा सुरु करण्यात आली आहे. तसेच संकुलांतर्गत महानगरपालिका शाळेचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. याव्यतिरिक्त सदर संकुलाच्या ३ कि.मी परिघामध्ये महानगरपालिकेच्या ४ व खाजगी ५ शाळा आहेत.

• सदर संकुलापासून बेस्ट बस थांबा, रिक्षा व टॅक्सीची सुविधा उपलब्ध आहे. बेस्ट बसेसच्या प्रति दिन ५०० पेक्षा अधिक फेऱ्या केल्या जातात.

• सदर संकुलांतर्गत महापालिकेमार्फत दवाखाना व आरोग्य केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

• सदर संकुलाशेजारी प्रसुतीगृह व दवाखान्याकरीता आरक्षित भुखंडाच्या विकासाचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले आहे नियोजित दवाखान्याच्या इमारतीचे आराखडे मंजूरीसाठी सादर केलेले आहेत.

-----------------

## बुलढाणा शहरामध्ये हनवतखेड फाटा ते त्रिशरण चौकापर्यंत उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(६७) * २९३७ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरामध्ये हनवतखेड फाटा ते त्रिशरण चौकापर्यंत उड्डाणपूल बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२) हनवतखेड फाटा ते त्रिशरण चौक ही लांबी मलकापूर-चिखली राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ ए चा भाग असून सदयस्थितीत मलकापूर ते चिखली ही लांबी खाजगीकरणांतर्गत विकसीत होऊन दि.२८.०५.२०२६ पर्यंत सवलत कालावधीत आहे.

मलकापूर-बुलढाणा-चिखली राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ ए रस्त्याच्या सर्वेक्षणासाठी प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याअंतर्गत विषयांकित उड्डाणपूल बांधण्याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उड्डाणपूलाच्या सर्वेक्षणाचा समावेश करण्याच्या सूचना सदर प्रकल्प सल्लागारास देण्यात आल्या आहेत.यास्तव सर्वेक्षणाबाबतचा सविस्तर अहवाल प्राप्त होताच केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येऊन पुढील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील एपीएमसी मार्केटमधील व्यापा-यांना सिडकोने सवलतीच्या दरात दिलेल्या भूखंडाच्या गैरव्यवहाराबाबत

**(६८) * १५२६ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथील एपीएमसी मार्केटमधील व्यापा-यांना गोदामे तयार करण्यासाठी सिडकोने सेक्टर १९ एफ मधील १० एकरचा सवलतीच्या दरात दिलेल्या भूखंडावर गोदाम तयार करण्याऐवजी मर्कंटाईल इमारत बांधकामासाठी सिडकोचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले नसून यात जवळपास ९०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

ए.पी.एम.सी. न्यु बाँबे मर्चंटस कॉमन वेअरहाऊसिंग यांना वाशी नोडमधील सेक्टर १९-एफ, भूखंड क्र.१ (२५०५३.७८ चौ.मी.) व भूखंड क्र.५ (१३४७२.८४ चौ.मी.) हे भूखंड "वेअरहाऊसिंग" प्रयोजनासाठी दि.१८.०५.१९९८ रोजीच्या भाडेपपट्टाकरारनाम्यान्वये वाटप करण्यात आले आहेत. सदर संस्थेने सिडको महामंडळाची परवानगी न घेता परस्पर नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडून दि.३०.०८.२०११ रोजी भूखंडाचा वापर व्यापार प्रयोजनासाठी करुन घेतला आहे. भूखंड वाटपाच्या करारनाम्यातील अटीनुसार बांधकाम केले नसल्याने सदर संस्थेस सिडकोने दि.७.१०.२०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली असून प्रस्तुत प्रकरणाची सिडकोच्या दक्षता विभागामार्फत चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सायन उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे रखडलेले काम वेळेत पुर्ण करण्याबाबत

**(६९) * ३१३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.कालीदास**

**कोळंबकर (वडाळा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन उड्डाणपुलाच्या दुरुस्तीपूर्वीचे प्राथमिक काम सुरु झाले मात्र उड्डाणपुलांचे बेअरिंग बदलण्याचे काम लवकर संपवण्यासाठी आवश्यक असलेले अधिक जॅक्स अद्याप एमएसआरडीसीकडे उपलब्ध झाले नसल्याने हे काम माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाच्या बेअरिंग बदलण्याच्या कामासाठी याआधी १२ जॅक्सचा वापर करण्यात येणार होता मात्र यासाठी जास्त कालावधी लागणार असल्यामुळे शंभर जॅक्सचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करुन रखडलेले उड्डाणपुलाचे काम वेळेत पुर्ण करून वाहतुक सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

शीव उड्डाणपूलाचे बेअरिंग बदलण्याचे काम माहे मे, २०१८ मध्ये हाती घेण्यात आले असून निविदेतील तरतूदीनुसार बेअरिंगचे संकल्पचित्र बनविण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची होती. सायन उड्डाणपुलाच्या बेअरींग चे संकल्पचित्र नवीन कोड प्रमाणे करणे आवश्यक होते. या बेअरींगचे बोल्ट व स्लिव्हज तंतोतंत जूळणे गरजेचे होते. सुरुवातीच्या कालावधीमध्ये तांत्रिक अडचणीमुळे नवीन संकल्पचित्र अंतिम करण्यास वेळ लागला होता. सदरचे काम कमी कालावधीत पूर्ण करण्यासाठी एकूण १०७ जॅक्स एकाच वेळेस उपलब्ध करुन एकाच टप्प्यामध्ये बेअरिंग बदलण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत यापैकी ४० जॅक ठेकेदारामार्फत उपलब्ध करुन घेण्यात आले आहेत व लवकरच उर्वरीत ६७ जॅक उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे कमीत कमी दिवस वाहतूक बंद ठेवून बेअरिंगचे काम पुर्ण करता येईल.

(३) शीव उड्डाणपूलाचे बेअरिंग बदलण्याचे काम फेब्रुवारी, २०२० मधील पहिल्या आठवड्यापासून सुरु करण्यात येणार आहे व सदरचे काम पुढील ५० दिवसांमध्ये पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथे प्रशासकीय इमारत उभारण्याबाबत**

**(७०) * १५४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथे नागरिकांना शासकीय कामात होणारा आर्थिक व मानसिक त्रास कमी होण्यासाठी सर्वच शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्याकरिता उभारण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरीत १० टक्के काम निधी अभावी रखडले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रशासकीय इमारतीचे काम माहे फेब्रुवारी, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना तीन वर्षाचा कालावधी होवूनसुद्धा अद्यापही अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी उभारण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीला निधी उपलब्ध करून देऊन उर्वरित बांधकाम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) प्रशासकीय इमारतीचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून न्याय प्रविष्ठ जागेतील बांधकाम अद्याप पूर्ण व्हावयाचे आहे.

(३) प्रलंबित न्यायालयीन दावा संपुष्टात आल्यानंतर इमारतीचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आंजणी रेल्वे स्टेशन ते खाडीपट्टयातील ११ गावांना जोडणारा खाडीपूल उभारण्याबाबत

**(७१) * १३४२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पन्हाळजे, बहिरवली, रजवेल, मुंबके, शिर्षी, तुंबाड, कोरगांव, होडखाड, कर्जी, अनसपुरे, सवणस या गावांना आंजणी रेल्वे स्टेशनला पोहोचण्यासाठी सुमारे ६० किलोमीटरचा वळसा घालून जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंजणी रेल्वे स्टेशन आणि खाडीपट्ट्यातील गावे यामध्ये असलेल्या खाडीवर पूल बांधण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधींना केली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने सदर खाडीवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे अंशतः खरे आहे. सद्य:स्थितीत विषयांकित गावामधील प्रवाशांना खेड रेल्वे स्टेशनला पोहोचण्यास सरासरी ३०.०५ कि.मी इतके अंतर पार करावे लागते.
(२) होय.

(३) व (४) विषयांकित पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.